पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १८१ ■ बुधवार, दि. ७ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com







## भाजपाला निवडणूक आयोगाचा दणका !

प्रतिनिधी ७ जानेवारी

**मुंबई :** महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांमधील निवडणुक मतदानाला एका आठवड्यांचा कालवधी शिल्लक असतानाच निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीला मोठा धक्का दिला आहे. यामुळे भाजपाला प्रचारादरम्यान फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निवडणूक आयोगाने भाजपाला जो दणका दिला तो पक्षाच्या प्रचार गीतासंदर्भात आहे. भाजपाचे प्रचार गीत निवडणूक आयोगाने नाकारले आहे.

## मागची पानं पलटायची तर खुशाल पलटा !

प्रतिनिधी ७ जानेवारी

**पुणे :** पुण्यातील जाहीर सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना इशारा दिल्यानंतर आज अजित पवारांनी या वक्तव्याला प्रत्युत्तर दिलं आहे. 'प्रत्येकाला पान चाळण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. तो अधिकार त्यांनी वापरावा. मी माझी भूमिका मांडतो, ते त्यांची भूमिका मांडतील,' असं अजित पवार म्हणाले. दरम्यान, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही फडणवीसांच्या वक्तव्याचा संदर्भ देत अजित पवारांना पुन्हा इशारा दिला. 'मागची पानं पलटवली तर अजित पवारांनाही बोलता येणार नाही.

# काँग्रेस-एम आय एम सोबतची भाजपची युती खपवून घेणार नाही

प्रतिनिधी ७ जानेवारी

**मुंबई:** अकोट आणि अंबरनाथ नगरपरिषदांमध्ये सत्तेसाठी भाजपने अनुक्रमे एमआयएम आणि काँग्रेससोबत केलेल्या हातमिळवणीमुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या 'विचित्र' समीकरणांवर आता खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत कडक भूमिका घेतली आहे. काँग्रेस आणि एमआयएमसोबत कोणतीही युती



चालणार नाही. अशी युती म्हणजे अनुशासनहीनता आहे. ही युती तोडावीच लागेल. ही युती करणाऱ्यांवर कारवाई होईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. महापालिका निवडणुकींवर या निर्णयाने चांगलाच परिणाम झाला आहे.

राज्यात आगामी महानगरपालिका निवडणुकीचे वारे वाहत असतानाच, अकोट आणि अंबरनाथमध्ये भाजपने सत्तेसाठी केलेल्या स्थानिक आघाड्यांनी सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. अकोटमध्ये 'एमआयएम' आणि अंबरनाथमध्ये 'काँग्रेस'सोबत भाजपने संसार थाटल्याने विरोधकांनी भाजपला लक्ष्य केले आहे. मात्र, या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक नेत्यांवर प्रचंड नाराजी व्यक्त केली असून संबंधितांवर कारवाईचा इशारा दिला आहे.भाजपच्या या स्थानिक प्रयोगांमुळे विरोधकांना आयतेच कोलीत मिळाले आहे. 'भाजप सत्तेसाठी काहीही करू शकते, हे यातून सिद्ध झाले आहे,' अशी टीका विरोधकांकडून होत आहे. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या कडक पवित्र्यामुळे आता अकोट आणि अंबरनाथमधील भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

### नेमके काय म्हणाले मुख्यमंत्री फडणवीस?

अकोटमध्ये भाजपने एमआयएमसोबत तर अंबरनाथमध्ये काँग्रेसशी युती झाल्याने देवेंद्र फडणवीसांनी स्थानिक नेत्यांवर प्रचंड नाराज झाले आहेत. ते म्हणाले, 'स्थानिक पातळीवर काँग्रेस किंवा एमआयएमसोबत कोणतीही युती खपवून घेतली जाणार नाही. ही युती तत्वशून्य आहे आणि ती होऊच शकत नाही. अशी युती म्हणजे अनुशासनहीनता आहे आणि ती तोडावीच लागेल. स्थानिक नेत्यांनी जरी हा निर्णय घेतला असला, तरी तो पूर्णपणे चुकीचा आहे. ज्याने कोणी ही युती घडवून आणली असेल, त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. यासंदर्भात आम्ही आदेश दिले आहेत.


### अकोटमध्ये 'अजब' विकास मंच!

अकोट नगरपरिषदेत सत्तेचा आकडा गाठण्यासाठी भाजपने 'अकोट विकास मंच' स्थापन केला आहे. या आघाडीचे स्वरूप पाहून राजकीय विश्लेषकही चक्रावून गेले आहेत. या मंचमध्ये भारतीय जनता पक्ष, एमआयएम , शिवसेना (शिंदे गट) आणि शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), प्रहार जनशक्ती (बच्चू कडू) पक्ष एकत्र आले आहेत. या सर्व पक्षांनी एकत्र येत जिल्हाधिकाऱ्यांकडे या नव्या गटाची अधिकृत नोंदणीही केली आहे.

### अंबरनाथ नगरपरिषदेतही काँग्रेससोबत हातमिळवणी

अकोटमधील घडामोडींप्रमाणेच ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपरिषदेतही भाजपने वेगळेच राजकीय समीकरण तयार केले आहे. येथे भाजपने थेट काँग्रेससोबत हातमिळवणी करत सत्तेचा मार्ग निवडला आहे. 'काँग्रेसमुक्त भारत'चा नारा देणाऱ्या भाजपकडून काँग्रेससोबत युती होत असल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विशेष म्हणजे, या युतीत शिवसेना शिंदे गटाला बाजूला ठेवण्यात आल्याने शिंदे गटासाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. भाजप आणि काँग्रेस एकत्र येऊन अंबरनाथ नगरपरिषदेत बहुमत स्थापन करणार असल्याचा दावा केला जात आहे.

# प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष हिदायत पटेल यांचा मृत्यू; जुन्या वादातून हल्ला !





प्रतिनिधी ७ जानेवारी

**अकोट :** अकोट तालुक्यातील मोहाळा गावात प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष, माजी जिल्हाध्यक्ष हिदायतउल्ला खाँ बरकतउल्ला खाँ पटेल यांच्यावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. उपचार सुरू असताना मंगळवारी उशिरा रात्री त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे मोहाळा गावासह अकोट तालुक्यात तणाव निर्माण झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास मोहाळा गावातील मशिदीत नमाज अदा करत असताना उबेद खाँ कालू खाँ उर्फ राजिक खाँ पटेल (२२) या आरोपीने हिदायत पटेल यांच्यावर अचानक चाकूने हल्ला केला. आरोपीने सलग चार वार केल्याने हिदायत पटेल गंभीर जखमी झाले. त्यांच्या शरीरावर चार खोल जखमा झाल्या होत्या.

घटनेनंतर त्यांना तात्काळ अकोट येथील खाजगी धांडे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने अकोला येथे हलविण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, प्रकृती अधिक बिघडल्याने अकोला येथील सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांना अकोट येथे पाचारण करून तातडीचे उपचार करण्यात आले. सायंकाळी सुमारे सात वाजताच्या सुमारास पुढील उपचारासाठी त्यांना अकोला येथील सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान उशिरा रात्री त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली.घटनेची माहिती मिळताच अकोट ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व सहायक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने तपास सुरू करण्यात आला. धांडे हॉस्पिटल व घटनास्थळी कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला. फॉरेन्सिक पथकाच्या सहाय्याने घटनास्थळावरून पुरावे गोळा करण्यात आले असून ई-साक्ष नोंदविण्यात आल्या.आरोपीच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखा, अकोट ग्रामीण, अकोट शहर आदी पोलिस ठाण्यांच्या सहा विशेष पथकांची स्थापना करण्यात आली. सुमारे ४० अधिकारी व अंमलदारांनी गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे अथक प्रयत्न करून अवघ्या सहा तासांत आरोपी उबेद खाँ कालू खाँ उर्फ राजिक खाँ याला रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास ग्राम पणज (ता. अकोट) येथून ताब्यात घेतले.या प्रकरणी अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### हिदायत पटेल यांची हत्या दुर्दैवी

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हिदायत पटेल यांची हत्या दुर्दैवी आहे अशी प्रतिक्रिया आमदार साजीद खान पठाण यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की राज्यात नेते सुरक्षित नाही तर सामान्यांची काय स्थिती असेल. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पटेल यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहणार आहेत. त्या नंतर काँग्रेसची भूमिका ठरवू असे आमदार पठाण म्हणाले.


# राज्यात 9000 शिक्षकांची भरती होणार !

**▸▸मार्च महिन्यापासून भरती प्रक्रियेला सुरुवात ▸▸पवित्र पोर्टलद्वारे केली जाणार भरती**

प्रतिनिधी ७ जानेवारी

**पुणे :** शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. जिल्हा परिषद, महापालिका आणि नगरपालिकाच्या शाळांमध्ये शिक्षक भरती होणार आहे. सुमारे ९००० शिक्षकांची भरती केली जाणार आहे. यामध्ये २०२४-२५ आणि मे २०२६ पर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या जागांचादेखील समावेश आहे.

राज्यातील शिक्षक भरती पवित्र पोर्टलद्वारे होणार आहे. मार्चपासून ही भरती प्रक्रिया सुरु केली जाणार आहे, असं शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितलं



आहे.राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची संख्या कमी आहे. अनेकदा शाळेत शिकवण्यासाठी शिक्षकच नसतात. यावर हिवाळी अधिवेशनात आमदारांनी शिक्षक भरतीची मागणी केली. याच पार्श्वभूमीवर मे २०२६ पर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांची पदे भरली जाणार आहे. यामध्ये जिल्हा परिषद, महापालिका आणि नगरपालिकांमध्ये ५७०० पदे रिक्त आहेत. २५ मार्च २०२४ च्या निर्णयानुसार, जिल्हा परिषदेच्या शाळांची २०२५-२६ मध्ये संचमान्यता पूर्ण झाले. यामध्ये अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे पहिल्यांदाच समायोजन करणार आहेत. यामध्ये रिक्त पदांच्या ८० टक्के जागा भरल्या जाणार आहे. राज्यातील सर्व जिल्हा परिषद, महापालिका आणि नगरपालिकांना २०२६ मेपर्यंत निवृत्त होणाऱ्या शिक्षकांची पदे समाविष्ट करुन त्याची जाहिरात अपलोड करण्यास सांगितले आहे.

## बेरोजगार अग्निवीरांना राज्य सरकारचा हातभार !

प्रतिनिधी ७ जानेवारी

**मुंबई :** अग्निवीर म्हणून भारतीय सशस्त्र दलांमध्ये चार वर्षांची सेवा बजावल्यानंतर बेरोजगार होणाऱ्या राज्यातील अग्निविरांसाठी आता राज्य सरकारने मतदीचा हात पुढे केला आहे. सैन्यातून माघारी फिरलेल्या तरुणांना राज्य सरकारच्या सेवेत सामावून घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या असून त्यासाठीचे धोरण ठरविण्यासाठी एका अभ्यासगटाची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्र सरकारने सन २०२२मध्ये सेना, नौदल आणि वायुसेना या भारतीय सशस्त्र दलांमध्ये तरुणांची भरती करण्यासाठी अग्निवीर ही योजना सुरु केली आहे.




# काफिला निघाला... काफिला चालला..! उमेदवारांचा डोअर टू डोअर प्रचारावर भर



प्रतिनिधी ७ जानेवारी

**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार रंगत आला असून, सध्या डिजिटल प्लॅटफार्म उपलब्ध असूनही सर्वच पक्षांचे उमेदवार प्रत्यक्ष मतदारांच्या भेटीवर भर देताना दिसून येत आहेत. त्यामुळे सकाळपासूनच त्यांच्या प्रचार पदयात्रेला प्रारंभ होत आहे. कमी वेळ असल्याने उमेदवाराची चांगलीच धावपळ होत असून, कार्यकर्ते सकाळी या उमेदवारासोबत तर दुपारी दुसऱ्या अन् संध्याकाळी तिसऱ्याच उमेदवाराच्या प्रचार रॅलीत दिसत असल्याने त्यांचीही चांगलीच दमछाक होताना दिसत आहे. काही असले तरी मनपा निवडणुकीमुळे शहरात चैतन्य पसरले असून, दिवसभर वॉर्डा-वॉर्डात विविध पक्षांच्या उमेदवारांचे काफिले दिसून येत आहेत.जग कितीही आधुनिक झाले तरी जुन्या प्रचार माध्यमांचा उपयोग मोठ्या प्रमाणात होताना दिसून येत आहे. आता एका क्लिकवर उमेदवारांचा संपूर्ण बायोडाटा मतदारांपर्यंत पोहोचत असला तरी प्रत्यक्ष वॉर्डात फिरून मतदारांची भेट घेण्याला उमेदवार प्राधान्य देत आहेत. तसेच ऑटो, पायडल रिक्षा, बॅनरबाजी, पॉम्पलेट वाटप या माध्यमांचाही मोठ्या प्रमाणात वापर होतान दिसून येत आहे. ऐनकेन प्रकारे आपण मतदारांच्या दारापर्यंत गेलो पाहिले हा यामागील उमेदवारांचा मुख्य उद्देश असल्याचे दिसून येते. प्रत्येक वॉर्डात सकाळपासूनच उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांचे जथ्थेच्या जथ्थेच दिसून येत आहे. उमेदवार स्वत: आपल्या घरापर्यंत आल्याने मतदारही त्यांना सहानुभूती दाखवित भाऊ आम्ही तुमच्या सोबतच म्हणून दुजोरा देत आहेत.

### सोशल मीडियाचाही घेतात आधार

उमेदवारांनी आता हात मोकळा केला असून, ते कोणतीच रिस्क घ्यायला तयार नाही. त्यामुळे प्रचाराची एकही संधी ते सोडत नाहीत. सध्या सोशल मीडिया प्रचाराचे प्रभावी माध्यम असल्याने सर्वच उमेदवार त्याचा मोठ्या प्रमाण वापर करताना दिसून येत आहेत. त्यासाठी वेगळा विभागच त्यांनी केला आहे. व्हॉट्स ॲप, एक्स, फसबूक, इस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियाच्या प्लॅटफार्मचाही पुरेपूर वापर ते करीत आहेत. त्यामुळे सध्या जिकडे तिकडे निवडणुकीचा माहोल तयार झाला आहे.

### अंगारकीची अनेकांनी साधली संधी

उमेदवार प्रचाराची एकही संधी सोडताना दिसत नाहीत. काल मंगळवारी अंगारकी चतुर्थी असल्याने गणेश मंदिरांमध्ये मोठ्या प्रामाणात गर्दी झाली होती. या ठिकाणीही काही उमेदवार प्रचार करताना दिसून आले.

# एका इसमास ताब्यात घेवून त्याचे ताब्यातून देशीकट्टा व एक जिवंत काडतूस जप्त

## अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी ७ जानेवारी

**अमरावती :** पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अमरावती महानगर पालीका निवडुक असल्याने निवडणुकी दरम्यान काही समाजकंटक इसम हे स्वतः जवळ अवैधरीत्या शस्त्र बाळगुण निवडणुकी दरम्यान दहशत निर्माण करून अळथळा निर्माण करू शकतात अशा समाजकंटकावर प्रभावी कार्यवाही करण्याचे आदेश दिल्यावरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गोपनिय बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली.




दि. ०६/०१/२०२६ रोजी गुन्हेशाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात घातक शस्त्राबाबत मोहीम राबवली असता पथकाला गोपनिय माहीती मिळाली की, पो.स्टे. बडनेरा हददीतील बगिया टि पॉइंट जवळ एक इसम नामे नावेद प्रतिक उर्फ पद्या विनोद कैथवास वय २० वर्ष रा. माताफैल जुनीवस्ती बडनेरा अमरावती हा अग्नीशस्त्र सारखे घातक शस्त्र कंबरेला लावून उभा आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरून गुन्हे शाखेच्या पथकाने बगिया टि पॉइंट जवळ जावून मोठ्या शिताफीने त्याला ताब्यात घेतले. त्याचे ताब्यातून एक देशी कटटा (पिस्टल) व एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. नमूद आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याचेवर यापुर्वी आयुक्तालयात गंभीर गुन्हे दाखल आहेत. नमूद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन बडनेरा येथे कलम ३/२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५, मपोका प्रमाणे गुन्हा केला.

ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव प्रतिक उर्फ पद्या विनोद कैथवास वय २० वर्ष रा. माताफैल जुनीवस्ती बडनेरा अमरावती. असे असून जप्त करण्यात आलेला मुददेमाल मध्ये एक नग देशी कटटा (पिस्टल) कि.अं. ४००००/-रू, २)एक नग जिवंत काडतूस (रांउड) कि.अं. १०००/- रू, असा एकुण ४१,०००-०० रूपये मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर ची कारवाई. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परीमंडळ-१ गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त परीमंडळ-२ श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय तथा गुन्हे) रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे) शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखे चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, सचिन बहाळे, जहीर शेख, अतुल संभे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, राजीक रायलीवाले यांनी केली आहे.

# स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेला थाटात सुरुवात

◆ भारताच्या विकास प्रक्रियेत तरुणांचे प्रश्न दुर्लक्षित झाले आहेत, या विषयावर रंगली वैचारिक दंगल

प्रतिनिधी ७ जानेवारी

**अमरावती** सामाजिक परिस्थिती बदलण्यासाठी चांगल्या उपक्रमाची गरज आहे. वकृत्वातून भाऊसाहेब घडले. भाऊसाहेबांना अपेक्षित असणारे कार्य या स्पर्धेच्या माध्यमातून होत आहे असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ यांनी केले.



स्व. माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान आणि डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात उद्घाटक म्हणून ते बोलत होते. सोमवार,दि.५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी अकरा वाजता वाजता डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती येथे राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेला थाटात सुरुवात झाली.

शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सव निमित्ताने आयोजित ही स्पर्धा 'भारताच्या विकास प्रक्रियेत तरुणांचे प्रश्न दुर्लक्षित झाले आहेत' या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर आयोजित करण्यात आली. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला प्रा. डॉ. एकनाथराव तट्टे, प्रा. डॉ.स्वप्नील इंगोले, प्रा. बायदनी, आजीवन सभासद आनंदराव देशमुख, पप्पू उर्फ मंगेश पाटील,प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख, संयोजक प्रफुल्ल घवळे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना हेमंत काळमेघ म्हणाले की भाऊसाहेबांसारखे रोल मॉडेल डोळ्यासमोर ठेवून तरुणांनी आपल्या वेळेचे नियोजन करायला पाहिजे. भाऊसाहेब वक्तृत्वातून घडले. त्यांना अपेक्षित असणारे विद्यार्थी अशा प्रकारच्या स्पर्धेतून निर्माण होत आहे. आजची तरुणाई भरकटलेली असताना त्यांना योग्य प्रकारचे मार्गदर्शन अशा प्रकारच्या उपक्रमातून होते म्हणून हीच खरी महापुरुषांना श्रद्धांजली आहे असे यावेळी ते म्हणाले. प्राचार्य वर्षा देशमुख यांनी स्वागत पर भाषण केले. प्रा डॉ.शितलबाबू तायडे यांनी परीक्षक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रास्ताविक वैशाली घवळे(गरकल)यांनी केले. संचालन प्रा.रत्नाकर शिरसाट तर आभार प्रदर्शन मयूर चौधरी यांनी केले. स्पर्धेत विषयाच्या अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही बाजूंनी विचार मांडणारे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील महाविद्यालयीन संघ सहभागी झाले.

# जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकार दिन साजरा



**अमरावती** : पत्रकार दिनानिमित्त मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक आद्य पत्रकार 'दर्पणकार' आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू करून मराठी पत्रकारितेचा पाया रचला. त्यामुळे ६ जानेवारी हा दिवस 'पत्रकार दिन' किंवा 'दर्पण दिन' म्हणून साजरा केला जातो. यावेळी माहिती अधिकारी अपर्णा यावलकर, वरिष्ठ लिपीक मनोज थोरात, योगेश गावंडे, लिपीक कोमल भगत सहायक छायाचित्रकार सागर राणे, वाहन चालक स्वप्नील महल्ले, संदेश वाहक राजश्री चौरपगार, प्रतिक वानखडे आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# कामगारांची ग्रॅज्युइटी हडप केल्याप्रकरणी रतन इंडियाच्या प्रवेशद्वारावर पेटले रण

विवेक गुल्हाने यांच्या नेतृत्वात शेकडो कामगारांचे उपोषण सुरू
रतन इंडिया व्यवस्थापनाने आंदोलन दडपण्याचा केला प्रयत्न

प्रतिनिधी ७ जानेवारी

**नांदगाव पेठ:** रतन इंडिया ऊर्जा प्रकल्प व्यवस्थापनाने कामगारांच्या कष्टाची ग्रॅज्युइटी हडप केल्याचा धक्कादायक प्रकार चव्हाट्यावर आल्यानंतर सोमवारी सकाळपासून प्रकल्पाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर संतप्त कामगारांचा उद्रेक पाहायला मिळाला. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कामगारांनी उपोषण सुरू करत रतन इंडिया व्यवस्थापनाविरोधात थेट संघर्षाची घोषणा केली असून न्याय मिळेपर्यंत उपोषण सुरू राहणार असल्याचा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे.




कामगारांनी वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाने कानाडोळा केल्यामुळे अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. आंदोलन दडपण्यासाठी रतन इंडिया व्यवस्थापनाने कामगारांना धमकावण्याचे प्रकार सुरू केल्याचा आरोप असून, रात्री आंदोलनकर्त्यांचा मंडप हटविण्याचेही प्रयत्न करण्यात आले. मात्र कामगार कोणत्याही दबावाला न झुकता आपल्या न्याय्य हक्कांसाठी ठामपणे उभे राहिले आहेत. या आंदोलनामुळे रतन इंडिया व्यवस्थापनासह प्रशासनाचे धाबे दणाणले असून, ही लढाई आता 'आर या पार' जाणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाची सह कंपनी असलेल्या दिल्ली मॅनेजमेंट फॅसिलिटी (डीएमएफ) मधील कामगारांनी १३ नोव्हेंबर २०१७ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत सलग ७ वर्षे ६ महिने सेवा बजावली आहे. ग्रॅज्युइटी कायद्यानुसार उपदान देणे बंधनकारक असताना, डीएमएफ कंपनीचे कामकाज ३० एप्रिल २०२५ रोजी संपुष्टात येऊन ७–८ महिने उलटूनही एकाही कामगाराला ग्रॅज्युइटी मिळालेली नाही, हा प्रकार म्हणजे उघड कायदेभंग असल्याचा गंभीर आरोप उपोषणकर्ते विवेक गुल्हाने यांनी केला आहे.

इतकेच नव्हे तर मार्च २०२१ च्या वेतनातून कामगारांचे प्रत्येकी १२०० ते १३०० रुपये कपात करण्यात आलेली रक्कम आजतागायत परत करण्यात आलेली नाही. ही सरळसरळ कामगारांच्या घामाच्या पैशांची लूट असून, रतन इंडिया व्यवस्थापनाने त्वरित सर्व थकबाकी अदा करावी, अशी ठाम मागणी विवेक गुल्हाने यांनी केली.दुपारी वैद्यकीय पथकाने विवेक गुल्हाने यांच्यासह उपोषणकर्त्यांची तपासणी केली. मात्र सायंकाळपर्यंत ना प्रशासनाने ना रतन इंडिया व्यवस्थापनाने कोणतीही ठोस दखल घेतली नसल्याने कामगारांमध्ये प्रचंड संताप उसळला आहे. या उपोषणस्थळी विवेक गुल्हाने यांचे सह मनीषा गुल्हाने, वीरेंद्र लंगडे, मोनिका पिहुलकर, भारती गेडाम, रेखा गिरी, नागेंद्र तायडे, आकाश गुल्हाने, नितीन काळे, विजय भुयार, सागर खराटे, विजय झटाले, अनिल खंडारे, नरेश गेडाम, संजय खंडारे, गौरव मनोहर, अनिकेत बीजवे, भैया वासनिक, राजेश चौधरी, सिद्धार्थ नाईक, मंगेश खाडे, महेंद्र पानेकर, अंकुश कांबळे, अनिल भगत, राजू खाडे, संदीप तुरे, आनंद मनोहर, विलास इंगोले, किशोर खंडारे, उमेश शेंडे, समाधान तुरे, केशव सायखेडे, बबन बैले, शरद धर्माळे, मनोहर मोहिते, अतुल देशमुख, प्रतीक खाडे, विनोद टेकाडे, राजेश मोहोड, गौरव मनोहर आदी कार्यकर्ते तसेच शेकडो कामगार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रासपाचे प्रदेश महासचिव अतुल इंगळे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश

आ. संजय खोडके व आ. सौ. सुलभाताई खोडके यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनात काम करण्याची दर्शविली इच्छा
नवसारी प्रभागातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांना निवडून आणण्याचा केला निर्धार

प्रतिनिधी ७ जानेवारी

**अमरावती :** राष्ट्रीय समाज पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे महाराष्ट्र प्रदेश सचिव - अतुल इंगळे यांनी नामदार अजितदादा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहिर प्रवेश केला आहे. राष्ट्रवादीचे प्रदेश संघटन महासचिव - आ.संजय खोडके यांचे कुशल नेतृत्व व कार्यशैली तसेच अमरावती मतदार संघातील आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या विकास कामांनी प्रभावित होऊन अतुल इंगळे यांनी सुद्धा समाजासाठी चांगले काम करण्याची इच्छा व्यक्त करित राष्ट्रीय समाज पक्षाला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादीचे घड्याळ बांधले आहे. इतकेच नाही तर अमरावती महानगर पालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा प्रचार करून प्रामुख्याने नवसारी प्रभागातील उमेदवार निवडून आणण्यासाठी




अहोरात्र मेहनत करण्याचा विश्वास अतुल इंगळे यांनी व्यक्त केला.

नवसारी प्रभागाच्या मुख्य प्रचार कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी अतुल इंगळे यांचा पक्ष प्रवेश संपन्न झाला असून दोन्ही आमदार महोदयांनी त्यांना राष्ट्रवादीचा दुपट्टा देऊन पक्षात स्वागत केले. यावेळी युवा नेते यश खोडके, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष प्रशांत डवरे , माजी नगरसेविका - स्वातीताई जावरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार - संकेत दिलीपराव महल्ले, परविन बानो मोहम्मद फारुख, प्रियाताई प्रमोद धनाडे, सुनील जावरे आदी उपस्थित होते. अतुल इंगळे हे गेल्या २० वर्षापासून सामाजिक , शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत असून बहुजन समाजाचे प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी ते अनेक सामाजिक चळवळ व आंदोलनात सक्रिय राहिले आहेत. आपले सामाजिक कार्य पुढेही सुरु राहण्यासाठी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पुरोगामी विचार व धर्मनिरपेक्ष विचारधारेला पसंती देऊन काम करण्याची इच्छा व्यक्त केली. म्हणूनच आ.संजय खोडके व आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी अतुल इंगळे यांना काम करण्याची संधी दिली असून लवकरच त्यांना पक्षाच्या वतीने नवीन जबाबदारी देण्यात येणार आहे. असे वृत्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अमरावती शहर प्रसिद्धी प्रमुख अमित तायडे यांनी कळविले आहे.

# गुन्हे शाखा अमरावती शहरकडुन इंस्टावर ग्रामवर घातक शस्त्रासह दहशत पसरविण्याचा व्हिडीओ व्हायरल करणाऱ्या इसमास अटक

प्रतिनिधी ७ जानेवारी

**अमरावती :** गुन्हे शाखा अमरावती शहर यांना एक इसम हा इंस्टाग्राम वर चाकु सास्खे घातक शस्त्र हातामध्ये घेवुन त्याचा व्हि.डी.ओ व्हायरल करून समाजात दहशत निर्माण करीत असल्याची माहीती प्राप्त झाली. त्या वरून सदर इसमाची ओळख पटवुन त्यास आज दिनांक ०६.०१.२०२६ रोजी पो.नि.. संदीप चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा येथील पथकाने आरोपी नामे शेख चांद शेख रहीम वय २० वर्ष रा. इमाम नगर लालखडी अमरावती यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन व्हिडीओ मध्ये वापरलेला एक लोखंडी चाकु जप्त करून पोलीस स्टेशन नागपुरी गेट येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव शेख चांद शेख रहीम वय २० वर्ष रा. इमाम नगर लालखडी अमरावती असे असून जप्त करण्यात आलेला मुददेमाल १) एक लोखंडी चाकु कि.अ.१२००/- रू

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला,पोलीस उपायुक्त परीमंडळ-१ गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त परीमंडळ-२ श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय तथा गुन्हे) रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे) शिवाजी बचाटे, यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि महेश इंगोले, पोलीस अंमलदार गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश परीमल, विकास गुडधे, नईम बेग, योगेश पवार, सागर ठाकरे यांनी केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# खामगाव प्रेस क्लबचा 'खामगाव रत्न पुरस्कार' संजय खंडेराव यांना प्रदान

प्रतिनिधी ७ जानेवारी

**खामगाव :** खामगांव प्रेस क्लबच्या वतीने शहरातील स्थानिक पत्रकार भवनात ६ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात सामाजिक, पत्रकारिता व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी खामगाव रत्न पुरस्कार समाजसेवक संजय खंडेराव यांना प्रदान करण्यात आला, तर स्व, बाळासाहेब बिन्नीवाले पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार अनिल खोडके यांना देऊन गौरविण्यात आले.तसेच युवा प्रेरणा पत्रकारिता पुरस्कार' सुरज बोराखडे यांना देऊन सन्मानित करण्यात आले.



या कार्यक्रमास ज्ञानेश्वर पाटील, वंचित बहुजन आघाडीचे नेते अशोक सोनोने, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दिलीपकुमार सानंदा, उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी, तहसीलदार सुनील पाटील, अड, अमोल अंधारे, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत रेठेकर, खामगाव प्रेस क्लबचे अध्यक्ष किशोर भोसले, ज्येष्ठ पत्रकार डॉ. राजेश राजरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आपली व्यवस्थापनात विशेष कार्य करणाऱ्या संजय खंडेराव यांना खामगाव रत्न पुरस्कार देण्यात आला. खंडेराव यांचा परिचय नाना हिवराळे यांनी करून दिला. तर खामगाव गौरव पुरस्कार क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला देण्यात आला. हनुमान व्यायाम मंडळाचा परिचय अनूप गवळी यांनी दिला. तर स्थ. बाळासाहेब बिन्नीवाले पुरस्कार पत्रकार अनिल खोडके यांना देण्यात आला. त्यांचा परिचय श्रीधर ढगे यांनी दिला.त्याचवेळी खामगाव प्रेस क्लबचा युवा प्रेरणा पत्रकारिता पुरस्कार सूरज बोराखडे यांना प्रदान करण्यात आला. त्यांचा परिचय सुनिल गुळवे यांनी करून दिला. त्याचवेळी सत्कारमूर्ती संजय खंडेराव, अनिल खोडके, सुरज बोराखडे तर हनुमान व्यायाम मंडळाच्यावतीने चंद्रकांत रेठेकर यांनी सत्काराला उत्तर देताना मनोगत व्यक्त केले.या प्रसंगी पीएचडी मिळाल्यामुळे डॉ. राजेश राजोरे यांचा सत्कार करण्यात आला, नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत विजयी झाल्याबद्दल सतीशआप्पा दुडे, ज्योती श्रीकांत भुसारी, तहसीन शाह यांचा सत्कार करण्यात आला.प्रास्ताविक राजेश राजोरो यांनी केले तर संचालन अनिल गवई यांनी केले तसेच आभार किशोर आप्पा भोसले यांनी आभार मानले.

# अकोला ते खाटू धाम 1100 किमी पायी यात्रा

◆ संग्रामपूर तालुक्यात ठीक ठिकाणी जंगी स्वागत

प्रतिनिधी ७ जानेवारी

**खामगाव :** अकोला ते खाटू धाम ११०० की मी पायदळ यात्रा अकोला येथील भजन व जम्मा गायक गोपाल शर्मा हारे यांच्या नेतृत्वखाली दिनांक २ जाणे रोजी सुरू करण्यात आली असता. संग्रामपूर तालुक्यात ३ जाणे रोजी दाखल झाली असता तालुक्यातील पातुर्डा फाटा, वानखेड, वरवट, संग्रामपूर ठिकठिकाणी खाटू श्याम देवाच्या रथ चे व पायदळ यात्रकरुंचे जंगी स्वागत करत त्यांना नाष्टा, चहा,जेवण ची व्यवस्था करण्यात आली होती.



अकोला येथील गायक गोपाल शर्मा हारे हे मागील २ वर्षा पासून अकोला ते खाटू धाम अशी ११०० की मी ची पायदळ यात्रा काढत असतात.या यात्रेला ध्वज निशाण पदयात्रा असे नाव देण्यात आले आहे.दिनांक २ जाणे रोजी सुरू केलेली पदयात्रा खाटू धाम ल २८ जाणे रोजी पोहोचणार आहे.ही यात्रा ३ राज्यातील ५० गावातून निघणार आहे.यात ५० गावांचे श्याम भक्त या खाटू धाम रथ यात्रेचे आणि खाटू देवाचे दर्शन घेणार आहेत.ही यात्रा संग्रामपूर तालुक्यात दिनांक ३ जाणे रोजी सायंकाळी ५ वाजता दाखल होताच पातुर्डा येथील भक्तांनी नाष्टा, चहा ची व्यवस्था करत त्याचे हार व दुपट्याने स्वागत केले.या नंतर वानखेड येथील भक्तांनी जेवनाची व्यवस्था केली.वरवट येथे चहा ची व्यवस्था करत पुढे संग्रामपूर येथे या पायदळ रथ यात्रेचे मुक्काम करण्यात आले. संग्रामपूर येथील भक्तांनी दिनांक ४ जाणे रोजी सकाळची नाष्टा व चहा ची व्यवस्था करत.रथ पुढे जळगाव जामोद साठी निघाला.या पायदळ यात्रेत १५ भक्त अकोला येथून निघाले आहेत. खाटू श्याम देवाला या परिसरात मान नारा वर्ग मोठ्या प्रमाणत असल्याने या रथ यात्रेचे भक्त ठीक ठिकाणी स्वागत करत दर्शन घेत आहेत.या वेळी जगन्नाथ पालीवाल, गोपाळ गांधी,हेमंत भुतडा,हरीश तापडिया,ललित चांडक,गणेश राठी,विजुभाऊ टावरी,रोशन चांडक,जतिन भुतडा,श्याम गांधी,सूरज राठी,पवन गोयल,हरीश चांडक,मोहन फेरण,मंगेश बोरनारे,श्रीकृष्ण महाले,दिनेश गावंडे,शिवा गाळकर, रुपेश पालीवाल,मनोज पालीवाल,राजेश राठी,दामोदर राठी,पंकज अगरवाल,दिनेश चांडक,सुरेश राठी,याच्या सह तालुक्यातील भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

खाटू श्याम भगवान हे या कलयुग मधील चमत्कारिक देव आहेत.शुद्ध मनाने या देवा जवळ आपली प्रार्थना मागितली की ती पूर्ण होतेच अश्या बऱ्याच भक्ताच्या प्रार्थना पूर्ण झाल्या आहेत याचे उदाहरण आहेत.

## भूतलावर येणे हा कर्माचा परिपाक- सिताराम शास्त्री

प्रतिनिधी ७ जानेवारी



**अकोला:** आम्ही या भूतलावर कर्माचे भोग भोगायला येतो.तर भगवंत हे कर्माने बांधण्यात आलेल्या जीवांच्या उद्धारासाठी प्रकट होत असतात.आमचा जन्म होत असतो तर भगवंतांचे प्राकट्य होत असते.हा मोठा भेद मानव व भगवंतात असतात.कर्म हे बरे वाईट असू शकते.त्या नुसार आपणास कर्म बंधन घटत असते.म्हणून योग्य व आदर्श कर्माची कास धरण्याचे आवाहन शुकताल येथील भागवत कथाकार प. पु. सितराम शास्त्री यांनी केले. श्रीमद भागवत सेवा समिती व संत श्री राधे राधे महाराज भक्त परिवारच्या वतीने संत श्री राधे राधे महाराज यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त न्यू राधाकिसन प्लॉट परिसरातील माहेश्वरी भवन येथे सुरू असलेल्या प. पु.सिताराम शास्त्री यांच्या भागवत कथेचे पंचम पुष्प सादर केले.

## चौधरी डिजिटल शाळेत आंतरशालेय भक्तीगीत गायन स्पर्धा संपन्न



प्रतिनिधी ७ जानेवारी

**अकोला:** दि बेरार एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित जानकीबाई चौधरी डिजिटल इंग्लिश शाळेत आंतरशालेय भक्ती गीत गायन स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यात अनेक शाळांनी सहभाग घेतला. राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्री यांच्या जयंतीनिमित्त तथा स्व. जानकीबाई चौधरी यांच्या स्मृती प्रित्यर्थ ही भक्ती गीत गायन स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्रा शैलजाताई अंधारे होत्या. स्पर्धा परीक्षक म्हणून प्रा. नाना भडके व सतीश खोडवे उपस्थित होते.यावेळी मुख्यध्यापिका सौ अश्विनी देशपांडे यांनी या स्पर्धेची माहिती दिली. ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली. अ गटात १ ते ५ वर्ग व ब गटात ६ ते १० वर्गाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

## शिवणी येथे राष्ट्रीय पत्रकार दिन साजरा; पत्रकारांचा सन्मान



**अकोला :** राष्ट्रीय पत्रकार दिनानिमित्त मंगळवार दि. ६ जानेवारी २०२६ रोजी आदर्श टेक्निकल ॲड मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, शिवणी यांच्या वतीने पत्रकारांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. संस्थेचे संचालक भिमराव गुडदे यांच्या हस्ते महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रमोद मुरुमकार व पत्रकार सिध्दार्थ वाहुरवाघ यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बोलताना भिमराव गुडदे यांनी राष्ट्रीय पत्रकार दिनाच्या शुभेच्छा देत समाजात सत्य, प्रामाणिकपणा व लोकहितासाठी कार्य करणाऱ्या पत्रकारांच्या योगदानाचे कौतुक केले. पत्रकार हे समाजाचे आरसे असून त्यांच्या लेखणीमुळे समाजप्रबोधन घडते, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात बोलताना महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रमोद मुरुमकार यांनी सत्काराबद्दल आभार मानले.

# लोकशाही व्यवस्थेत पत्रकारांची भूमिका महत्वपूर्ण– सुनील लहाने

## ◆ मतदार जनजागृती व निवडणुकीतील पत्रकारांच्या भूमिकेवर मंथन

प्रतिनिधी ७ जानेवारी




**अकोला :** लोकशाही व्यवस्थेत निवडणुका म्हणजे उत्सव असतो. चौथास्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माध्यम क्षेत्रातील पत्रकारांची भूमिका निवडणुकीच्या काळात अत्यंत महत्त्वपूर्ण व समाजासाठी दिशादर्शक असते, असे प्रतिपादन अकोला महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. सुनील लहाने यांनी आज येथे केले.

अकोला महानगर पालिका, श्री शिवाजी महाविद्यालय आणि अकोला श्रमिक पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने मराठी पत्रकार दिनानिमित्त मतदार जनजागृती व पत्रकार कार्यशाळेचे आयोजन वसंत सभागृहात करण्यात आले होते. यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आशिष राऊत यांच्या अध्यक्षते झालेल्या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा माहिती अधिकारी डॉ. हर्षवर्धन पवार उपस्थित होते. शिक्षणाधिकारी हरिश्चंद्र इटकर, श्रमिक पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रबोध देशपांडे प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते. संघटनेचे माजी अध्यक्ष अजय डांगे, उपाध्यक्ष शरद पाचपोर, सचिव विशाल बोरे, प्रमोद गावंडे, डॉ. श्रीकांत उखळकर, गोपाल हागे, दीपक अवताडे, प्रवीण खेते, शिवम पाथरकर आदींनी अतिथींचे स्वागत केले.

पुढे डॉ. लहाने म्हणाले, लोकशाहीमध्ये अधिकारासोबतच कर्तव्य देखील असतात. मतदान करणे ही मतदारांची मुख्य जबाबदारी. देशातील प्रत्येक नागरिकाने मतदान हे केलेच पाहिजे. त्यामुळे लोकशाही व्यवस्था बळकट होण्यास मदत होईल. डॉ. हर्षवर्धन पवार यांनी लोकशाही व्यवस्थेत पत्रकारांच्या भूमिकेवर सविस्तर मांडणी केली. निवडणुकांमध्ये पत्रकारांनी निष्पक्ष पत्रकारिता करावी. पत्रकारांच्या लेखनीमधूनच शासन, प्रशासनाचे लक्ष वेधून शाश्वत विकास घडतो, असे मत डॉ. पवार यांनी व्यक्त केले. पत्रकारांनी विश्वासार्हता आणि अचूकपणा जोपासण्यासाठी सतर्क राहणे गरजेचे असल्याचे मत प्रबोध देशपांडे यांनी व्यक्त केले. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभावी जनजागृती केली जात असून मतदानाची टक्केवारी निश्चित वाढेल, असा विश्वास हरिश्चंद्र इटकर यांनी व्यक्त केला. शहराचे भवितव्य घडवण्याच्या दृष्टीने निवडणूक अत्यंत महत्त्वाची असून प्रत्येकाने मतदान केलेच पाहिजे, असे आवाहन डॉ. आशिष राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रीकांत उखळकर यांनी केले, तर आभार प्रा शिल्पा शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाला महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा, संजय खराटे, सामर्थ्य फाउंडेशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष विनोद देव, सामाजिक कार्यकर्ते जावेद जकारिया, ज्येष्ठ पत्रकार राजकुमार उखळकर, रवींद्र बुलनकर, किरण चौक, सूर्यकांत बुडकले, विलास राठोड, राजेंद्र निकुंभ, प्रमोद रत्नपारखी, ज्येष्ठ नागरिक संघाचे डॉ. सत्यनारायण बाहेती, भावसार समाजाचे पदाधिकारी अनिल मावळे यांच्यासह पत्रकार, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांनी जाणले मतदानाचे महत्त्व

नवमतदार विद्यार्थ्यांनी निवडणुकीतील मतदानाचे महत्त्व जाणून घेतले. मतदार जनजागृती अभियानाचे नोडल अधिकारी हरिश्चंद्र इटकर, प्रा.डॉ. श्रीकांत उखळकर यांनी विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेची माहिती देऊन त्यांना मतदानासाठी प्रोत्साहित केले.

## साहित्यकणाच्या संमेलनाध्यक्षपदी सुरेश पाचकवडे यांची निवड

प्रतिनिधी ७ जानेवारी



**अकोला:** साहित्यकणा फाऊंडेशन नाशिकच्या वतीने दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अकोल्यातील नामवंत साहित्यिक सुरेश पाचकवडे यांची निवड झाली आहे. अलीकडेच त्यांना साहित्यकणा नाशिकचे अध्यक्ष संजय गोराडे, सचिव विलास पंचभाई यांनी कळविले आहे. साहित्य कणाचे हे अकरावे संमेलन १ फेब्रुवारी २०२६ रोजी नाशिक येथे होणार आहे.

सुरेश पाचकवडे यांनी यापूर्वी शुभम बाल साहित्य संमेलन अकोला, अंकुर मराठी साहित्य संमेलन मुर्तिजापूर, सृजन साहित्य संमेलन नागपूर, कलाविष्कार साहित्य संमेलन मुर्तिजापूर आणि अक्षरक्रांती साहित्य संमेलन नागपूर इत्यादी संमेलनाध्यक्षपदं भुषविली आहेत. त्यांच्या कथा, कवितांची सहा पुस्तकं प्रकाशित असून त्यांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कारासह अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

सुरेश पाचकवडे यांच्या कवितेचा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश असून ते विदर्भ साहित्य संघ शाखा अकोला चे उपाध्यक्ष, जिल्हा मराठी भाषा समितीचे अशासकिय सदस्य, साद बहुउद्देशीय संस्थेचे कार्याध्यक्ष, लोकस्वातंत्र पत्रकार महासंघाचे सल्लागार आहेत.

## बहुजन समाजाला डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यामुळे नवी दिशा मिळाली- भैय्यासाहेब पाटील

प्रतिनिधी ७ जानेवारी



**तेल्हारा:** श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा व श्रीमती पार्वती देवी तापडिया कॉन्हेट यांच्या वतीने आयोजित केलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम झाले. भाऊसाहेब यांच्या मुळे बहुजन समाजाला दिशा मिळाली अस श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष भैय्यासाहेब पुसदेकर म्हणाले.

कार्यक्रमाचे अतिथी म्हणून प्रा केशवराव गावंडे कार्यकारिणी सदस्य,प्रा सुभाषराव बनसोड कार्यकारिणी सदस्य सुरेशदादा खोटरे कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून सर्व आजिव सदस्य प्रा अण्णासाहेब ढोले, दादासाहेब पाटील, बाळासाहेब पाटील, साहेबराव सोनमाळे ॲड विश्वासराव नेरकर रमेश पाटील कोकाटे , शोएब अली मिर साहेब, माधवराव खोटरे पुरूषोत्तम पाटील दहे, नारायण देवतळे तसेच विशेष निमंत्रित शाळा समिती सदस्य सुधीर बापू देशमुख शामशिल भोपळे व उद्धवराव विखे शाळा तपासणी अधिकारी, अनिल भोपळे, प्राचार्य डॉ. गोपाल ढोले, प्रा उदय देशमुख, विलास गांवडे मुख्याध्यापक, विद्या देशमुख मुख्याध्यापिका , बाळासाहेब सरनाईक अकोला धनंजय भंगाळे जयंती उत्सव प्रमुख, सुनील वंजारी शिक्षक प्रतिनिधी विजय दहे शिक्षकेतर प्रतिनिधी, आकाश गवारगुरु, रोहित वानखडे, आरती तायडे प्रज्ञा गवारगुरू विद्यार्थी प्रतिनिधी सर्व माजी प्राचार्य शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी वर्ग विद्यार्थी पत्रकार मंडळी उपस्थित होती. प्रास्ताविक विलास गांवडे मुख्याध्यापक यांनी केले आहे,प्रा सुभाषराव बनसोड,प्रा केशवराव गावंडे, सुरेशदादा खोटरे यांनी मनोगत व्यक्त केले आहे कार्यक्रम चे अध्यक्ष भैय्यासाहेब पाटील पुसदेकर यांनी सांगितले की डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी शैक्षणिक कार्यासाठी स्वतःला झोकून देऊन एक लढा उभा केला आहे. तसेच सर्व विजयी खेळाडू व सांस्कृतिक कार्यक्रम,रंगभरण स्पर्धा, गुणवत्ता धारक विद्यार्थी यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले आहे . कार्यक्रमाचे संचालन शांतीकुमार सावरकर यांनी तर आभार प्रदर्शन सुनील वंजारी यांनी केले.

## सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया व पोलीस चौकीत पत्रकारांचा सन्मान



प्रतिनिधी ७ जानेवारी

**अडगांव बु.:** येथील सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया आणि पोलीस चौकीमध्ये 'पत्रकार दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात स्थानिक पत्रकारांचा गौरव करण्यात आला.सेन्ट्रल बँक शाखा अडगांव बु. येथे आयोजित कार्यक्रमात शाखा व्यवस्थापक मेश्राम सर यांनी उपस्थित पत्रकारांचे स्वागत केले. मेश्राम यांनी बँकेच्या विविध योजनांची माहिती दिली.

हिवरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अडगांव बु पोलीस चौकीम ध्येही पत्रकार दिनाचे औचित्य साधून विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस चौकीचे हेड कॉन्स्टेबल गुंजाम साहेब तसेच पोलीस पाटील हितेश हागे यांनी पत्रकारांचे स्वागत केले. हरीओम व्यास ,अशोक घाटे,माणिकराव घाटे,विलास वानखडे, नाना देशमुख, विठ्ठल बागडी, नारायण पत्की, पुरुषोत्तम निमकर्डे, राजेश रोहणकार, गणेश बुटे, अ.शरीफ,दिपक रेळे आदी पत्रकार हजर होते. कार्यक्रमाच्या शेवटी अडगांव बु. प्रेस क्लबचे सचिव नाना देशमुख यांनी आभार मानले.

## न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघ स्थापन

प्रतिनिधी ७ जानेवारी

**अकोला:** न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य माधव मुनशी तर प्रमुख अतिथी अकोला एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष तथा डॉ. विजय नानोटी होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्राचार्यांनी माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्याचा उद्देश कथन केला. तसेच आपली शाळा २३ जुलै २०२६,पासून शाळा शतक महोत्सवी वर्षात पदार्पण करणार आहे. शाळेशी नातं घट्ट करूया असे प्राचार्यांनी प्रास्ताविकात सांगितले. प्रमुख अतिथींनी विद्यार्थी दशेतील आठवणीला उजाळा दिला. संस्थेचे सचिव शार्दुल दिगंबर उपस्थित होते. नंतर माजी विद्यार्थी संघाची निवड करण्यात आली. अध्यक्ष म्हणून नारखेडे, उपाध्यक्षपदी पदी प्रशांत भरतीया, सचिव प्राचार्य माधव मुनशी, कोषाध्यक्ष माजी प्राचार्य डॉ. विजय नानोटी,



सल्लागार तुषार उज्जैनकर, उपक्रमशील शिक्षक म्हणून प्रा.नंदकीशोर थुटे, पालक प्रतिनिधी सदस्य श्रीकृष्ण मोरे, माजी महिला प्रतिनिधी सदस्य ऋतुजा नागपुरे, प्राची घोंगे, सेवानिवृत्त सदस्य निलेश देशपांडे या सर्वांची बिनविरोध निवड झाली. निवड झालेल्या कार्यकारिणीचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन उपप्राचार्य हातवळणे, पर्यवेक्षक हेमंत ओझरकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी प्रा. अमोल बुटे यांनी केले. माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन तुषार उज्जनकर यांनी तर आभार प्रा. नंदकिशोर थुटे यांनी मानले.

सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला शहरात उपलब्ध आहे
परळीकर न्यूजपेपर एजन्सी - डाबकी रोड 9766005335
अरुण गुजर बुक स्टॉल - नविन बस स्थानक 9423429605
येळणे बुक स्टॉल - नविन बस स्थानक 9028947634
वाडेकर बुक स्टॉल - जुने बस स्टँड 9921940878
यश न्यूज पॉईंट - मलकापूर 9075012816
मेडोना युनुसेट सलून - बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789
पेंटर पाठक एजन्सी - महानगर पालिका मागे, अकोला 8605844453
जाहिरातीसाठी संपर्क 9209956616
बातम्यासाठी संपर्क 9075012801

## खुल्या प्रवर्गातील युवकांना २१ दिवसांचे उद्योजकता प्रशिक्षण; 'अमृत'चा उपक्रम

प्रतिनिधी ७ जानेवारी

**अकोला:** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनीतर्फे (अमृत) व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या सहकार्याने खुल्या प्रवर्गातील युवकांना २१ दिवसांचे विनामूल्य प्रशिक्षण शिबिराद्वारे दिले जाणार आहे.

खुल्या गटामधील ब्राह्मण, बनिया, वत्स, कम्मा, कायस्थ, नायर, अय्यंगार, पाटीदार, बंगाली, पटेल, मारवाडी, येलमार, त्यागी, गुजराथी, सेनगुनथर, सिंधी, नायडू, राजपूत, कोमटी या अमृत लक्षित गटातील ४० युवक व युवती उमेदवारांचे विनामूल्य २१ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम दि. ७ जानेवारी ते ३१ जानेवारी दरम्यान होईल. त्यात उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास, उद्योजकीय गुण व संपदा, सुसंवाद कला, सरकारी कर्ज आणि अनुदान योजना, बँकेची कार्यप्रणाली, उद्योग उभारणी व उद्योग व्यवस्थापन, अभिप्रेरणा प्रशिक्षण कार्यक्रम, विक्री कला, बाजारपेठ पाहणी, प्रकल्प अहवाल, यशस्वी उद्योजकाचे मनोगत, उद्योगांना भेटी, विविध क्षेत्रातील संधी, मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमाची कर्ज प्रकरणे आदींबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. या कार्यक्रमासाठी किमान ८ वी उत्तीर्ण, आधारपत्र, पॅनकार्ड, गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, ८ लाखाच्या आत उत्पन्नाचा दाखला, वयोमर्यादा १८ वर्ष आवश्यक. त्यानुसार युवक व युवती उमेदवारांनी दि. ५ जानेवारी रोजी दु. ४ वा. पूर्वी चेतन टिपरे, (मो. नं. ८८०५४७७४६५), महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जिल्हा उद्योग केंद्र, शुक्ल सदन, दुर्गा चौक, अकोला येथे कागदपत्रांसह अर्ज करावा. त्यानंतर त्यांची मुलाखत घेऊन प्रशिक्षणार्थीची निवड करण्यात येईल.

## अचूक माहिती संकलनासाठी अद्ययावत साधनांचा वापर-जिल्हाधिकारी

**अकोला:** २०२७च्या राष्ट्रीय जनगणना प्रक्रियेची प्रशासकीय तयारी सुरू झाली असून, कर्मचा-यांच्या प्रशिक्षणालाही प्रारंभ झाला आहे. त्यात महाराष्ट्र जनगणना संचालनालय व केंद्रीय गृह मंत्रालय यांच्या वतीने कार्यशाळा नियोजनभवनात आज झाली. विश्वासार्ह आकडेवारी गोळा करण्यासाठी अद्ययावत साधने व यंत्रणेची तरतूद असून, अधिकारी-कर्मचा-यांनी प्रक्रियेतील प्रत्येक तरतूद काळजीपूर्वक जाणून घ्यावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले. प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात नियोजनभवनात तहसीलदार, नगरपरिषद मुख्याधिकारी, मंडळ अधिकारी यांची कार्यशाळा घेण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील,जनगणना संचालनालयाचे श्री.भगत, श्री.साळगावकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, आंतरराष्ट्रीय मानकांचा अवलंब करत अद्ययावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून माहिती संकलन करण्यात येणार आहे.

## प्रभाग क्र. १ मधील विकास कामे मार्गी लावा नगराध्यक्षा व मुख्याधिकाऱ्यांना सदस्यांचे निवेदन

प्रतिनिधी ७ जानेवारी



**तेल्हारा :** शहरा मध्ये इतर प्रभागांच्या तुलनेत प्रभाग क्रमांक एक मध्ये सर्वाधिक समस्या आहेत त्यामुळे सदर समस्या व तेथील प्रश्न अग्रक्रमाने सोडविणे आवश्यक आहेत तसेच पालिके मध्ये सुरू असलेल्या पंतप्रधान आवास योजने मधील जाचक अटी रद्द करून सर्वांना घरकुल कसे देता येतील व विना विलंब त्यांना अनुदान मिळवून देण्यासाठी योग्य तो निर्णय घ्यावा तसेच प्रलंबित गुंठेवारीचा प्रश्न व बॉण्ड पेपर वरील मालमत्तेची नोंदी करून सर्वांना घरकुल देण्या बाबत लवकर निर्णय घ्यावा याकरिता प्रभाग क्रमांक एक मधील नगरसेवीका कान्होपात्रा रामभाऊ फाटकर यांनी ६ जानेवारीला विकास कामे मार्गी लावण्याबाबत तेल्हारा पालिकेच्या अध्यक्षा व मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन मागणी केली आहे .

नव्याने हद्दीत समाविष्ट झालेल्या पाढरी या भागा मध्ये अनेक समस्या आहेत सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटारी नाल्या नाहीत ज्या आहेत त्याची साफसफाई नाही , काही ठिकाणी रस्ते नाहीत , विद्युत पोल वरील बहुतांश स्ट्रीट लाईट बंद आहेत सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे येथिल नागरिकांन समोर ही मोठी समस्या आहे , या भागात स्मशानभूमीची सुद्धा आवश्यकता आहे तसेच पाढरी या भागात बुद्ध विहार व एक सभागृह बांधण्यात यावे

तसेंच या भागातील नागरिकांना पिण्याकरिता शुद्ध पाणी मिळावे याकरिता पाईपलाईन द्वारे शहरातून पाणी पुरवठा करावा येथील नागरिकांच्या घरकुलचा प्रश्न सोडवावा तेल्हारा शहरापासून हा भाग तीन किलोमीटर अंतरावर असल्यामुळे तेथील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात.

सुपिनाथ नगरातील नादुरुस्त नाल्या दुरुस्त करून साडपाण्याची विल्हेवाट लावावी , या भागातील संत गाडगेबाबा सभागृहासमोरील जागेवर आवार भिंत बांधून या भागात उपलब्ध जागेवर विद्यार्थ्यांकरीता अभ्यासिका , अंगणवाळी व साहित्या सह व्यायाम शाळा बांधण्यात यावी तसेच मारुतीरायांच्या मंदिरासमोर सभागृह बांधन्यात यावे . गाडगे पुरा येथील व्यायामशाळेच्या मागील भागात जे स्वच्छालय बांधण्यात आले ते पाडून रस्ता मोठा करण्यात यावा व व्यायाम शाळेच्या वर बांधकाम करून व्यायाम शाळेचे साहित्य ठेवण्याची व्यवस्था करावी , धर्मवीर संभाजी चौका मध्ये हनुमानजींच्या मंदिराजवळ उपलब्ध जागेवर व्यायाम शाळा बांधण्यात यावी ,सिद्धार्थ नगर मधील ज्या नागरिकांनच्या घरांच्या जागेच्या नोंदीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे तो सोडविण्यासाठी प्रयत्न करावा, कैलास पवार यांच्या घरासमोरिल व वासुदेवराव चव्हाण यांच्या घरा जवळील टाकोनकार समाज बांधवांनचे आराध्य दैवत माँ वळेखण माऊली मातेच्या मंदिरा समोर सामाजिक सभागृह बांधण्यात यावे , माळेगाव नाका ते संत रविदास महाराज चौका पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूला सांडपाणी वाहून जाण्याकरिता मोठी गटार व्यवस्था ,विद्युत व्यवस्था ,वृक्षारोपण व रस्त्याच्या दोन्ही बाजूला नागरिकांच्या घरासमोर पेव्हर रस्ता करण्यात यावा अशी मागणी केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. ७ जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## लाखी येथे यात्रेदरम्यान किरकोळ धक्क्याचा मोठा वाद; चौघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी ७ जानेवारी

**पुसद** : पुसद तालुक्यातील वाघजाळी येथील रहिवासी भाऊराव प्रकाश राठोड हे लाखी गावात आयोजित करण्यात आलेल्या दगडी याडीच्या यात्रेत सहभागी झाले होते. यात्रेदरम्यान गर्दीत त्यांचा धक्का सचिन भाऊराव राठोड (वय ४०, रा. लाखी) यांना लागला. या किरकोळ कारणावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला. सुरुवातीला शाब्दिक वाद सुरू असताना काही वेळातच त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. या वादात सचिन राठोड, नितीन राठोड, शामराव जाधव व सचिन जाधव (सर्व रा. लाखी) यांनी एकत्र येत भाऊराव राठोड यांना बेदम मारहाण केली. काही आरोपींनी रस्त्यावर पडलेले दगड उचलून त्यांच्या हातावर, डोक्यावर व डोळ्याच्या भागावर जोरदार वार केले. या हल्ल्यात भाऊराव राठोड यांच्या डोळ्याला गंभीर जखम झाली असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# सिमेंट काँक्रीट रस्ता दोन महिन्यांत उखडला

### सावंगा-चिरकुटा-महाळुंगी रस्त्याच्या कामात गैरप्रकार; सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

प्रतिनिधी ७ जानेवारी

**दिग्रस :** दिग्रस तालुक्यातील सावंगा-चिरकुटा-महाळुंगी मार्गावर बांधलेला सिमेंट काँक्रीट रस्ता लवकरच खराब होऊन उखडल्याने लाखो रुपयांच्या भ्रष्टाचाराचा पर्दाफाश झाला आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पुसद यांच्या देखरेखीखाली बनवलेला हा रस्ता काही महिन्यांतच खराब झाला असून, रस्त्याच्या निकृष्ट दर्जामुळे नागरिकांमध्ये मोठा असंतोष आहे.







हा रस्ता बांधताना संबंधित ठेकेदाराला शासकीय मान्यता न घेता कागदोपत्री उत्कृष्ट काम दाखवून दर्जाहीन रस्ता बनवला गेल्याचा आरोप आहे. सिमेंट काँक्रीट रस्ता हा एकदा बनवला की, त्याला अनेक वर्षे दुरुस्तीची आवश्यकता नसते, पण ह्या रस्त्याचे तुकडे फुटून गेले असून, सडलेला रस्ता धावपळ करणार्या नागरिकांसाठी एक मोठा त्रास ठरला आहे. सदर प्रकरणावर कार्यकारी अभियंता कोणतीही ठोस प्रतिक्रिया देत नसून, संबंधित ठेकेदाराला वाचवण्यासाठी अधिकाऱ्यांनी कोणतीही कृती केली की नाही, हे सध्या स्पष्ट नाही. शंका आहे की या अधिकारी आणि ठेकेदारांमध्ये काही वर्तमनाचा संबंध असू शकतो. त्याचप्रमाणे, पुसदचे कार्यकारी अभियंता सुद्धा या भ्रष्टाचार प्रकरणावर कुठेही तात्काळ कारवाई करत नाहीत. शहरात चर्चा आहे की, या अधिकारीवर्गाने अनेक वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत राहून कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार करून संपत्ती कमावली आहे. अनेक कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे काम करून लाखो रुपयांची लूट केली जात असल्याची माहितीही समोर आली आहे. सिमेंट काँक्रीट रस्ता मंजूर झाल्यानंतर नागरिकांना चांगला रस्ता मिळावा अशी आशा होती, परंतु दुर्दैवाने रस्ता उखडल्यामुळे नागरिकांमध्ये निराशा पसरली आहे. ह्या मार्गावर अनेक खड्डे तयार होण्यामुळे आधीच नागरिकांचे प्रवासाचे हाल होत होते, आता हे सिमेंट काँक्रीट रस्त्याचे वाईट स्थितीत येऊन पडले असल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढला आहे. यापूर्वीही रस्त्यावर अनेक खड्डे होऊन प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. तथापि, नागरिकांना चांगला रस्ता मिळण्याची त्यांची आशा पूर्तीसुद्धा न होऊन ते निराश झाले आहेत. तालुक्यातील नागरिक आता स्वतंत्र चौकशीची मागणी करत आहेत.त्यांनी उच्चस्तरीय तपास आणि ठेकेदारावर फौजदारी गुन्हा दाखल करून जनतेचे पैसे परत मिळवण्याची मागणी केली आहे. दिग्रस तालुक्यातील वरिष्ठ अधिकारी ह्या गंभीर प्रकरणावर लक्ष देत नसल्यामुळे नागरिकांना न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागेल. अशा प्रकारच्या भ्रष्टाचारावर आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही होईल, हे सर्वांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## बँकेच्या सहकारी सोसायटी प्रतिनिधींची सभा

प्रतिनिधी ७ जानेवारी

**उमरखेड** : यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संलग्न सहकारी सोसायट्यांतून निवडून आलेल्या तालुक्यातील बँक प्रतिनिधींची विचारमंथन सभा व सत्कार समारंभ सोमवारी (दि. ६ जानेवारी २०२६) विठ्ठल बाग येथे उत्साहात पार पडला. या वेळी आमदार किसन वानखेडे यांच्या हस्ते ३० नवनिर्वाचित बँक प्रतिनिधींचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.



या समारंभास आमदार किसन वानखेडे यांच्यासह माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर, जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, माजी आमदार विजय खडसे, जिनिंगचे माजी अध्यक्ष बालाजी उदावंत, किशोर वानखेडे, डॉ. अंकुश देवसरकर आदी मान्यवर उपस्थित होते. यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी संलग्न एकूण ५२ सहकारी सोसायट्या असून त्यापैकी ५० सोसायट्यांमध्ये बँक प्रतिनिधींची निवड यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. उर्वरित दोन सोसायट्यांमध्ये तांत्रिक कारणांमुळे प्रतिनिधी निवड प्रक्रिया होऊ शकलेली नाही.

यावेळी बोलताना वक्त्यांनी सहकार क्षेत्रातील अनुभव, पारदर्शकता आणि विश्वास या मूल्यांवर भर दिला. गेल्या सुमारे ३० वर्षांपासून माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर हे बँकेवर सातत्याने प्रतिनिधित्व करीत असून त्यांच्या दीर्घ अनुभवाचा विशेष उल्लेख करण्यात आला. काही प्रतिनिधींनी नाव न सांगण्याच्या अटीवर सहकार चळवळीतील मूल्ये जपण्याची आवश्यकता व्यक्त केली.

दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू असल्यामुळे बँक संचालक मंडळाची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. मात्र निवडणूक तयारीला गती देण्यात आली असून संघटनात्मक बांधणी, सभासद संपर्क व प्रचार रणनीतीवर भर दिला जात आहे.

सत्कार समारंभाच्या निमित्ताने नवनिर्वाचित प्रतिनिधींनी सहकार चळवळ अधिक बळकट करण्याची शपथ घेतली. जिल्ह्यातील आर्थिक विकासात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची भूमिका महत्त्वाची असून ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार व सर्वसामान्य सभासदांच्या हितासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## पुसदमध्ये शासकीय वेअरहाऊस मॅनेजरच्या मनमानी

### सोयाबीन खरेदी केंद्र चालक त्रस्त; निकषात बसणारा मालही केला जातोय 'रिजेक्ट'

प्रतिनिधी ७ जानेवारी

**ग्रेडरच्या तपासणीत हस्तक्षेपाचा गंभीर आरोप**

सोयाबीन खरेदी केंद्रावरील माल घेऊन गाडी जेव्हा वेअरहाऊसवर पोहोचते, तेव्हा नियमानुसार कंपनीचा अधिकृत ग्रेडर त्या मालाचे ॲनालिसिस करून गुणवत्ता तपासतो व माल उतरवून घेतो. मात्र पुसद येथील वेअरहाऊसवर ग्रेडरच्या ऐवजी मॅनेजर स्वतः किंवा आपल्या कर्मचाऱ्यांकडून माल तपासून विविध त्रुटी दाखवत माल रिजेक्ट केला जात असल्याचा गंभीर प्रकार सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

**पुसद** : एकीकडे नैसर्गिक संकटांमुळे आधीच अडचणीत सापडलेला बळीराजा कसाबसा आपला शेतमाल घेऊन शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर पोहोचत आहे. मात्र दुसरीकडे प्रशासकीय लालफितीचा व अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराचा फटका शेतकरी व खरेदी केंद्र चालकांना बसत असल्याचे चित्र पुसद येथे दिसून येत आहे.

पुसद येथील शासकीय वेअरहाऊस (गोडाऊन) मॅनेजरच्या आडमुठ्या भूमिकेमुळे, खरेदी केंद्रावरील ग्रेडरकडून 'ओके' ठरवलेला आणि शासनाच्या सर्व निकषांत बसणारा सोयाबीन मालही विनाकारण नाकारला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

शासनाने शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू केली आहेत. पणन महामंडळ व जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांच्या अधिनस्त असलेल्या पुसद व महागाव येथील शासकीय-खाजगी खरेदी केंद्रांवर शेतकरी आपला माल घेऊन येत आहेत. नियमानुसार खरेदी केंद्रावर नियुक्त असलेल्या ग्रेडरकडून सोयाबीनची आर्द्रता, डागी, कचऱ्याचे प्रमाण तपासून माल पास केला जातो.

मात्र ग्रेडरने मंजूर केलेला माल जेव्हा वेअरहाऊसवर जमा करण्यासाठी जातो, तेव्हा तेथील मॅनेजर आपल्या अधिकाराचा गैरवापर करत "माल खराब आहे, आर्द्रता जास्त आहे, सोयाबीन अपरिपक्व आहे" अशी कारणे देत माल उतरवून घेण्यास नकार देत असल्याचा आरोप केला जात आहे.

खरेदी केंद्रावरील तज्ज्ञांनी मंजूर केलेला माल वेअरहाऊस मॅनेजर कशाच्या आधारे बाद ठरवतो? असा संतप्त सवाल शेतकरी व केंद्र चालक उपस्थित करत आहेत.

या मनमानी कारभारामुळे सोयाबीन खरेदी केंद्र चालकांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. माल ने-आण करण्याचा दुप्पट वाहतूक खर्च, वेअरहाऊसवर तासन्तास उभ्या राहणाऱ्या वाहनांमुळे वाढणारे भाडे, तसेच वेळेचा अपव्यय याचा फटका केंद्र चालकांना बसत आहे. परिणामी सोयाबीन रिजेक्ट झाल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे वेळेवर मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

गेल्या अनेक दिवसांपासून हा प्रकार सुरू असतानाही स्थानिक लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. वेअरहाऊस मॅनेजरवर कुणाचा वरदहस्त आहे? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

यामुळे वखार महामंडळाचे अधिकारी, पणन महामंडळ तसेच जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी तातडीने या प्रकरणात लक्ष घालून वेअरहाऊस मॅनेजरच्या मनमानीला आळा घालावा, तसेच खरेदी केंद्र चालक व शेतकऱ्यांची होणारी अडवणूक थांबवावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## प्रेस क्लबच्या वतीने पत्रकार दिन

प्रतिनिधी ७ जानेवारी

**पांढरकवडा** : मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य स्व. बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिनानिमित्त प्रेस क्लब पांढरकवडाच्या वतीने सोमवारी (दि. ६) सायंकाळी स्थानिक विश्रामगृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास पांढरकवडातील पत्रकार व प्रेस क्लबचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित पत्रकारांनी त्यांच्या कार्यास आदरांजली वाहिली. मार्गदर्शन करताना प्रेस क्लब पांढरकवडाचे अध्यक्ष प्रवीण पिन्नमवार यांनी आचार्य जांभेकर यांच्या कार्याचे महत्त्व विशद केले. ६ जानेवारी १८१२ रोजी जन्मलेल्या आचार्य जांभेकर यांनी १८३२ साली 'दर्पण' हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू करून मराठी पत्रकारितेचा भक्कम पाया घातला. समाजप्रबोधन, विज्ञाननिष्ठ विचारसरणी आणि आधुनिक शिक्षणाचा प्रसार हे त्यांच्या पत्रकारितेचे प्रमुख उद्दिष्ट होते. त्यांच्या विचारांनी मराठी पत्रकारितेला नवी दिशा दिली असून आजही त्यांचे कार्य पत्रकारांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर प्रेस क्लब पांढरकवडाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रवीण पिन्नमवार, उपाध्यक्ष सफी खान, सचिव रवि वल्लमवार, कोषाध्यक्ष योगेश मडावी, ज्येष्ठ पत्रकार अशफाक खान, संभा मडावी, वाजीद कुरेशी, तनवीर शेख, गणेश सामजवार, संतोष मग्गीडवार यांच्यासह अन्य पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाचा शेवट पत्रकारितेतील मूल्ये जपण्याचा संकल्प करून करण्यात आला.

## विस वर्षांपासूनचे स्वप्न अक्षयचे झाले साकार, पत्रकार दिनी दिली मदत

प्रतिनिधी ७ जानेवारी

**ढाणकी** : मराठी पत्रकारितेचे जनक, आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती पत्रकार दिन म्हणून देशभर उत्साहात साजरी केली जाते. यानिमित्ताने राज्यभरातील पत्रकार विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात. यावर्षी ढाणकी शहर पत्रकार संघाने पत्रकार दिन साजरा करण्यासाठी सामाजिक दृष्टीकोन असलेला उपक्रम राबवला.



दिव्यांग अक्षय सुभाष हापसे याला मदत करून, त्याच्या जीवनात एक वेगळा आनंद आणण्यात आला. पत्रकार संघाने बाळशास्त्री जांभेकर यांच्या आदरांजलीसाठी हे विशेष कार्य केले. एक सामाजिक कार्य सुरू झाले की त्यात हात पुढे करणाऱ्यांची कमी होत नाही. ढाणकी नगरपंचायतीच्या निवडणुकीदरम्यान मुख्याधिकारी म्हणून नियुक्त केलेले अरुण मोळक यांनी अक्षयच्या समस्येबद्दल वृत्तपत्राद्वारे माहिती घेतली आणि लगेच अक्षयला तीन चाकी सायकल भेट देण्याचा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे, रयत फाउंडेशन हिमायतनगर यांनी अक्षयसाठी पं. २५,००० रुपयांचा निधी गोळा केला. शहरातील दानशूर व्यक्तिमत्व असलेले धरमिचंद कोठारी यांचे सुपुत्र पराग कोठारी यांनी अक्षयला नवीन ड्रेस भेट दिला. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बाळासाहेब चंद्रे पाटील यांनीही रोख ५,००० रुपयांची मदत केली. या सर्व मदतीमुळे अक्षयच्या जीवनात एक नवा प्रकाश आला आहे. पत्रकार संघाचा आगामी मानस त्याला एक छोटासा व्यवसाय सुरू करून त्याला आत्मनिर्भर बनवण्याचा आहे. अक्षयच्या वृद्ध आई-वडिलांच्या डोळ्यातील आनंदाश्रू यावरूनच या उपक्रमाची महत्ता ठरते. शहर पत्रकार संघाने अक्षयची कहाणी आपापल्या वृत्तपत्रात मांडली होती आणि त्यावर आधारित ही मदत झाली. सदर कार्यक्रमाचे आयोजन ढाणकी शहरातील बौद्ध विहारात करण्यात आले होते. यावेळी शहरातील अनेक प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्वे, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस अधिकारी, आणि पत्रकार बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाची अध्यक्षता ढाणकी शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय भोसले यांनी केली. यावेळी उपाध्यक्ष उदय पुंडे, सचिव नागेश महाजन, ब्रह्मानंद मुनेश्वर, गजानन गंजेवाड, विनोद गायकवाड, मोहन कळमकर, सुनील अक्कावार, कैलास घुगरे, राहुल चौरे, स्वप्नील चिकाटे, नंदकिशोर जाधव, सुभाष कस्तुरे, पंजाब भुतनर आणि इतर पत्रकार संघाचे सदस्य उपस्थित होते.

## सावित्रीबाई फुले पुतळा प्रकरणी पाचव्या वंशजांचा एल्गार

### पुतळा तात्काळ बसवा, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन व आमरण उपोषण : नीता होले

प्रतिनिधी ७ जानेवारी

**यवतमाळ** : यवतमाळ शहरातील मध्यवर्ती स्टेट बँक चौक येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा हटविल्याच्या निषेधार्थ तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. 2 जानेवारी 2026 रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुतळा समिती व यवतमाळमधील सर्व परिवर्तनवादी चळवळींच्या वतीने सदर ठिकाणी पुतळा बसविण्यात आला होता. मात्र 3 जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले जयंतीच्या पूर्वसंध्येला स्थानिक प्रशासनाने हा पुतळा हटविल्याने वाद निर्माण झाला आहे.



या घटनेची माहिती मिळताच क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पाचव्या वंशज नीता होले यांनी तातडीने पुण्याहून यवतमाळ गाठले. त्यांनी जिल्हाधिकारी व संबंधित प्रशासनाची भेट घेऊन सावित्रीबाई फुले यांचा पुतळा कुठल्याही परिस्थितीत तात्काळ त्याच ठिकाणी बसवावा, अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रभर जनआंदोलन उभारण्यात येईल तसेच मी स्वतः पुतळ्याच्या जागी आमरण उपोषण करीन, असा खणखणीत इशारा दिला. यामुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे.

देशभरात विविध पुतळे व धार्मिक वास्तू परवानगीशिवाय उभारल्या जात असताना, मानवतावादी विचारांचे प्रतीक असलेल्या सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याबाबत मात्र अडथळे निर्माण होणे हा अन्याय असल्याचा सवाल नीता होले यांनी उपस्थित केला. आवश्यक असल्यास मुख्यमंत्री व मंत्रिमंडळातील सदस्यांची भेट घेऊन हा विषय थेट त्यांच्या निदर्शनास आणू, असेही त्यांनी स्पष्ट केले.


यवतमाळमध्ये आगमनानंतर नीता होले यांनी पुतळ्याच्या जागेची पाहणी केली. त्यानंतर स्थानिक विश्राम भवन येथे परिवर्तनवादी चळवळीच्या कार्यकर्त्यांशी चर्चा करून पुतळा बसविण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे आवाहन केले. "महात्मा ज्योतिबा फुले यांचा क्रांतिकारी आदर्श माझ्या रक्तात आहे. या लढ्यात मी कुठल्याही परिस्थितीत मागे हटणार नाही," असे त्यांनी कार्यकर्त्यांना आश्वासन दिले.

यावेळी यवतमाळ शहरातील सामाजिक कार्यकर्ते, ओबीसी नेते, प्रशासकीय व परिवर्तनवादी चळवळीतील पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या तसेच फुले–शाहू–आंबेडकर विचारांचे शेकडो अनुयायी व विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोहिनी इंद्रनील नाईक पुसद नगरपरिषद अध्यक्षपदी विराजमान

प्रतिनिधी ७ जानेवारी

**पुसद** : पुसद नगरपरिषदेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या मोहिनी इंद्रनील नाईक यांचा सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता अधिकृत पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला.



या पदग्रहण सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), भारतीय जनता पक्ष तसेच अपक्षांचे सर्व नवनिर्वाचित नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगरपरिषदेत स्थिर व सक्षम प्रशासन राहावे या उद्देशाने, राष्ट्रवादी काँग्रेसकडे संख्याबळ असतानाही भाजप मित्र पक्षाला उपाध्यक्षपद बहाल करण्यात आले, तसेच अपक्ष नगरसेवकांचेही सहकार्य मिळाल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

नवनिर्वाचित अध्यक्ष मोहिनी ताई नाईक यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "निवडणूक जाहीरनाम्यात दिलेल्या वचनांनुसार पुसद शहर स्वच्छ, सुंदर, सुसंस्कृत व अतिक्रमणमुक्त करण्याचा आमचा ठाम मानस आहे." याप्रसंगी बोलताना राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सांगितले की, "केंद्रात आणि महाराष्ट्रात महायुतीचे सरकार असल्याने, भाजपसोबत नगरपरिषदेत सत्ता स्थापन करण्यात आली आहे. यामुळे राज्याच्या सहकार्याने पुसद शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच गती मिळेल." पदग्रहण सोहळ्यानिमित्त नगरपरिषद परिसरात कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

बुधवार दि.७ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




# फळबाग लागवड न करता अनुदान हडपले, भ्रष्टाचाराविरोधात वातावरण तापले !

## नियमांचा केला अनादर, अनुदान लाटण्यासाठी बोगस बिले केली सादर..





**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

जिल्ह्यातील रिसोड, तालुक्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोखरा योजनेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे निष्पन्न होत आहे. रिसोड तालुक्यात फळबागांची लागवड न करताच फळबाग योजनेचे अनुदान लाटल्याचे शेकडो प्रकार समोर येत आहेत. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे गावातील एकाच कुटुंबातील पती-पत्नीच्या नावावर विहीर खोदण्याआधीच फळबाग योजनेतून लाखों रुपयांचे अनुदान हडप केले असल्याची माहिती हाती आली आहे. सदर अनुदान लाटण्यासाठी नियमांचा अनादर करत, बोगस बिले सादर करण्यात आले असल्याचा आरोप आणि गैरप्रकारे अनुदान हडपले असल्याची तक्रार शेलुखडसे येथील शेतकरी वसंत खडसे यांनी सरकारकडे केली आहे.सदर तक्रारीची चौकशी सुरू असून ही चौकशी पारदर्शक करण्यात येते की थातुरमातुर होते याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

याबाबत भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाउपाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी सिटीन्यूज सुपरफास्टशी बोलतांना म्हटले आहे की, या गंभीर प्रकाराची महसूल व कृषी विभागाने स्थळ पाहणी करून यामध्ये दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. आणि रिसोड तालुक्यातील ईतर गैरप्रकाराची सुद्धा कसून चौकशी करावी.या प्रकरणात दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न झाला तर मोठे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देखील देशमुख यांनी दिला आहे. मध्यंतरी राज्यभर गाजलेल्या अकोला 'पोकरा' प्रकल्पात काही शेतकरी गटांनी घेतलेल्या अवजारे बँक प्रकरणाची विविध स्तरावर सखोल चौकशी झाली होती. त्याच धर्तीवर रिसोड तालुक्यात राबविण्यात आलेल्या फळबाग योजनांची चौकशी करून दोषींवर तातडीची कारवाई करावी अन्यथा भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडून थेट प्रकल्प संचालक यांच्याकडे तक्रार करण्यात येईल असा इशाराही देशमुख यांनी दिला आहे.

पुढे बोलतांना भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाउपाध्यक्ष अरविंद देशमुख म्हणाले की, विधान परिषदेचे तत्कालीन विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी कृषी विभागाअंतर्गत पोखरा योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतील भ्रष्टाचार संदर्भात लक्षवेधी प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना तत्कालीन कृषिमंत्री यांनी अवजारे बँक उभारणीच्या कामात अकोला जिल्ह्यात अनियमितता झाली असल्याचे कबूल केले होते. परिणामी अमरावती विभागीय कृषी सहसंचालकांनी चौकशीचे आदेश दिले होते. यात ११५ पैकी २४ शेतकरी गटांची तपासणी केली असता यातील तीन गटांकडे अवजारेच नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले होते. तर काही गटांच्या विरोधात फौजदारी कारवाई प्रस्थापित करण्यात आली होती. यात तब्बल ३ कोटी १७ लाख रुपयांची वसुली करण्याचे निर्देशीत केले होते. तीच स्थिती रिसोड तालुक्यात राबविण्यात आलेल्या फळबाग,विहीर, ठिंबक , शेडनेट व ईतर घटकांच्या योजनांची झाली असून, योजनेतील फळबाग लागवड न करताच अनुदान हडपल्याचा खळबळ जनक प्रकार शेलुखडसे गावातून पुढे येत आहे. या गंभीर प्रकाराची महसूल व कृषी विभागाने स्थळ पाहणी करून सखोल चौकशी करावी अशी मागणी देशमुख यांनी केली आहे. कारण फळबाग लागवड करणाऱ्या लाभार्थ्याने लागवडीची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे बंधनकारक असते. त्यानंतर योजनेच्या नियमांनुसार लागवड केलेल्या कलमांच्या, रोपांच्या खरेदी पावत्या अपलोड करून लागवड केलेल्या क्षेत्राचे जिओ - टॅगिंग केले जाते आणि ही सर्व कार्यवाही पार पाडल्यानंतर कागदपत्रांची पडताळणी करूनच अनुदान जमा केले जाते. मात्र हे सर्व असताना भ्रष्टाचार घडतोच कसा ? हा एक अनुत्तरित प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे या गंभीर प्रकाराची वरिष्ठ स्तरावरून सखोल चौकशी करण्यात यावी अशी भ्रष्टाचार निर्मूलन समितीची मागणी असल्याचे अरविंद देशमुख यांनी स्पष्ट केले.

### प्रशासन अकार्यक्षम, अनुदान हडपणारे झाले आर्थिक सक्षम

शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यात शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देणाऱ्या अनेक योजना आहेत. परंतु प्रत्येक योजनेत दलालांची मक्तेदारी वाढल्याने स्वतःचा आर्थिक स्वार्थ साधण्यासाठी काही लाचारांमुळे या स्तुत्य योजनांची वाट लागली आहे. काहींनी नामधारी शेतकरी गट तयार करून गटाच्या नावाखाली वैक्तिक स्वार्थ साधून घेतला असल्याचे पितळ चौकशीअंती उघडकीस येणार आहेच. पण त्याआधी या शेतकरी गटांना, कंपन्यांना असे बोगस बिले देण्याची आयडिया दिली कोणी ? ही बिले कुठे व कोणी तयार केली ? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सबंधित अधिकाऱ्यांनी ही बोगस बिले डोळे मिटून कशी मंजूर केली ? याची उत्तरे शोधणे खुप महत्त्वाचे आहे.

फळबाग योजनेत गैरव्यवहाराची प्रकरणे यापूर्वी सुद्धा उघडकीस आली आहेत. परंतु दोषींवर कठोर कारवाई न झाल्यामुळे अशा योजनात अंधाधुंद भ्रष्टाचार होत आहे. त्यामुळे अशा शंभर टक्के अनुदान मिळणाऱ्या फळबागांची नोंद ठेवून सदर फळबाग त्या गट नंबरात अस्तित्वात आहे का, याची स्थळ पाहणी करणे खुप गरजेचे झाले आहे. या गंभीर प्रकाराची महसूल व कृषी विभागाने तातडीने दखल घ्यावी अशी अपेक्षा आहे. जेणेकरून भविष्यात खऱ्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल !

**अरविंद देशमुख**
जिल्हाउपाध्यक्ष,
भ्रष्टाचार निर्मूलन समिती वाशिम

## थोडक्यात

### स्व.किसनराव सदार विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन



**● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●**

तालुक्यातील खडकी सदार येथे स्व. किसनराव सदार विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. स्वातीताई सदार होत्या तर पुणे येथील युवा उद्योजक ज्ञानेश्वर पाटील सदार यांनी या क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन केले. सदर कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. माधवराव जाधव, क्रीडा प्रमुख श्री. सतीश वायाळ, श्री . प्रमोद बकाल आदींची प्रमुख उपस्थिती होती.

स्व. किसनराव सदार विद्यालयामध्ये क्रीडा सप्ताहाचे आयोजन. ? खडकी सदार येथील स्व. किसनराव सदार विद्यालयामध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शालेय क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. स्वातीताई ज्ञानेश्वर सदार अध्यक्षा संत ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ खडकी सदार ह्या होत्या. तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक डॉक्टर ज्ञानेश्वर पाटील सदार युवा उद्योजक पुणे,तसेच प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री माधवराव जाधव, तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये क्रीडा प्रमुख श्री सतीश वायाळ , श्री प्रमोद बकाल हे होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आलेल्या सर्व पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले .त्यानंतर उद्घाटक डॉक्टर ज्ञानेश्वर पाटील सदार युवा उद्योजक पुणे, यांनी मैदानावर जाऊन क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. स्वातीताई सदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की. विद्यालयामध्ये अभ्यासाबरोबरच खेळाचे सप्ताह घेणे सुद्धा महत्त्वाचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो, त्यांच्यामध्ये सांघिक भावना निर्माण होते, तसेच त्यांच्या शरीराची योग्य वाढ होते, मन, शरीर, बुद्धी , मूल्य, अशा विविध गुणांचा त्यांच्यामध्ये समावेश होतो, भारताची भूमी ही वीरांची आहे, छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये कुस्ती, कबड्डी, तसेच व्यायाम शाळा, यांना राज आश्रय दिला. त्यामुळे आज कुस्ती हा जागतिक खेळ बनला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अशा क्रीडा सप्ताहा मध्ये भाग घेऊन, आपला सर्वांगीण, विकास करून घ्यावा. असे विद्यार्थ्यांना समजून सांगितले, तसेच डॉ. ज्ञानेश्वर पाटील सदार यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना खेळांबरोबरच व्यायाम आणि योगासने याचे महत्त्व पटवून दिले. विद्यालयामध्ये मोठ्या उत्साहाने क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन, तसेच आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रदीप वाठोरे (स्काऊट) यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री श्रीराम फुपाटे यांनी केले. क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यासाठी शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# शहरातील विकास कामे रखडले , पूर्ण होण्याआधीच रस्ते उखडले !

## ठेकेदारावर कारवाई करा, अन्यथा उपोषण — राम पाटील डोरले यांचा इशारा

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

वाशिम शहरातील शेकडो विकास कामे रखडले आहेत. बारा वर्षात पाच सहा वेळा रस्ते होऊनी नागरिकाची जीवन खड्ड्यातच गेले आहे. रस्त्याचे कामे पूर्ण होण्याआधीच रस्ते उखळत आहेत .. त्यामुळे ठेकेदार कंपनीवर तात्काळ दंडात्मक कारवाई करून काळ्या यादीत टाकण्यात यावे, अन्यथा २४ जानेवारीपासून उपोषण करण्याचा इशारा आम आदमी पार्टीचे नेते. राम पाटील डोरले यांनी निवेदनाद्वारे दिला आहे..

सदर ठेकेदार कंपनीस सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम अंतर्गत येणाऱ्या विविध विकास कामांचा कार्यारंभ आदेश दिनांक ०४ मार्च २०२१ रोजी देण्यात आला होता. ही सर्व कामे ४०० दिवसांत पूर्ण करणे अपेक्षित असताना, आज जवळपास चार वर्षांचा कालावधी उलटून गेला तरीही केवळ ५० टक्क्यांपेक्षा कमी काम पूर्ण झाले आहे.

या दिरंगाईमुळे शहरातील रस्ते,



सार्वजनिक सुविधा व इतर विकास कामे रखडली असून नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. सार्वजनिक निधीचा योग्य वापर होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असून, यामुळे शासन व प्रशासनाची प्रतिमा देखील मलीन होत आहे.ठेकेदार कंपनीकडून होत असलेला निष्काळजीपणा, कामातील दिरंगाई व कराराच्या अटींचा भंग लक्षात घेता, महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार सदर कंपनीवर दंडात्मक कारवाई करून तिला काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशी मागणी राम पाटील डोरले यांनी केली आहे.

या संदर्भात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम यांना लेखी तक्रार सादर करण्यात आली असून, प्रशासनाने तात्काळ ठोस कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जर प्रशासनाकडून लवकरात लवकर कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नाही, तर दि. २४ जानेवारीपासून सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## विश्वमांगल्य सभेची रविवारी मासिक सदाचार सभा व बालसभा

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

संस्कार, सामर्थ्य, सदाचार आणि सेवा या चार स्तंभांवर आधारित कार्य करणाऱ्या विश्वमांगल्य सभेच्या वत्सगुल्म (वाशिम) शाखेच्या वतीने शहरात नित्य कार्यपद्धतीअंतर्गत मासिक सदाचार सभेला नव्याने प्रारंभ करण्यात येत आहे. ही सदाचार सभा रविवार, ४ जानेवारी रोजी दुपारी ३ ते ४.३० या वेळेत श्री संत नामदेव महाराज मंदिर, शिंपी वेटाळ येथे होणार आहे.

या सभेस वाशिमची लेक तथा विश्वमांगल्य सभेच्या पूर्णकालिक प्रचारिका व विभाग संघटन मंत्री कु. संगराताई चुंबळकर या प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

देव, देश व धर्माप्रती निष्ठा बाळगून महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान, वाशिमवासीयांसाठी आणखी एक आनंदाची बाब म्हणजे विश्वमांगल्य सभेच्या बालसभा आयामांतर्गत बालकांसाठी नित्य बालसभा सुरू करण्यात येत आहे.

'संस्कार, शस्त्र और शास्त्र' या संकल्पनेतून बालकांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी ही बालसभा उपयुक्त ठरणार आहे.

## वन्यजीव विभाग अकोला च्या वतीने पत्रकारांचा सत्कार

### सोहळ अभयारण्यात पत्रकार दिन साजरा

**● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●**

सोहळ काळवीट अभयारण्यात अकोला वन्यजीव विभागाच्या वतीने ६ जानेवारी रोजी सकाळी ११:०० वाजता पत्रकार दिनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे आयोजन यशवंत नागूलवार विभागीय वनाधिकारी अकोला वन्यजीव विभाग तसेच चेतन राठोड सहाय्यक वनसंरक्षक अकोला वन्यजीव विभाग, अकोला यांच्या मार्गदर्शनात

वनपरिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे



यांनी केले होते.कार्यक्रमात उपस्थित पत्रकारांचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनपरिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे होते.तर व्यासपीठावर गोपाल कडू,दिलीप रोकडे,नितीन वाणी व एकनाथ पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात पत्रकार विजय काळे, सुपनर सर,किरण क्षार सुनील फुलारी, मोहम्मद मुन्नीवाले,समीर देशपांडे, अमोल अघम ज्ञानेश्वर घुडे,सुधीर देशपांडे,अंकुश कडू, गोपाल कडू,दिलीप रोकडे,अक्षय लोटे, योगेश यादव,एकनाथ पवार, अभय खेडकर,जका खान,आरिफ पोपटे, चाँद मुन्नीवाले,संजय कडोळे, नितिन वाणी,विलास राउत, प्रदीप भाऊ वानखडे,मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण क्षार यांनी तर आभार प्रदर्शन समीर देशपांडे यांनी केले.सर्व पत्रकारांनी या उपक्रमाबद्दल वनपरिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे यांचे आभार मानले.


# वर्षभर निरंतर कामाचा अनुक्रम, १ १ १ १ यशस्वी शस्त्रक्रिया करून विक्रम !

## डॉ. रामहरी बेले यांचे अतुलनीय कार्याचे श्रम

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

वैद्यकीय क्षेत्रात काही कार्य हे केवळ नोकरीपुरते न राहता समाजसेवेचे जिवंत उदाहरण ठरतात. अशाच कार्याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे डॉ. रामहरी बेले. चालू वर्षात तब्बल १११९ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करून त्यांनी जिल्ह्याच्या आरोग्य इतिहासात एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.





गेल्या पाच वर्षांपासून सलग जिल्ह्यात कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करत असताना, शारीरिक व मानसिक ताण, वेळेची मर्यादा आणि जबाबदाऱ्यांचे ओझे असूनही डॉ. बेले यांनी आपले कार्य कधीही थांबवले नाही. विशेष म्हणजे, हे अत्यंत जिकिरीचे व जबाबदारीचे शस्त्रक्रिया कार्य ते आपल्या नियमित वैद्यकीय जबाबदाऱ्यांसोबत निरपेक्ष सेवाभावाने पार पाडत आहेत. चालू वर्षातील या ११११ यशस्वी शस्त्रक्रिया डॉ. पांडुरंग ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली आज यशस्वीरित्या पूर्ण झाल्या. जिल्हा आरोग्य प्रशासनाचा विश्वास, शिस्तबद्ध नियोजन आणि डॉ. बेले यांची शस्त्रक्रिया कौशल्ये या त्रिसूत्रीमुळेच हे मोठे यश शक्य झाले. आज संपूर्ण जिल्ह्यात एकमेव सर्जन म्हणून डॉ. बेले ज्या निष्ठेने व कौशल्याने काम करत आहेत, ते निश्चितच प्रेरणादायी आहे. कुटुंब नियोजनासारख्या संवेदनशील विषयात सुरक्षितता, अचूकता आणि रुग्णांचा विश्वास हे सर्वोच्च असते आणि या सर्व निकषांवर डॉ. बेले यांनी स्वतःला सिद्ध केले आहे. त्यांचे हे कार्य केवळ आकड्यांत मोजता येणारे नाही; ते कुटुंबांचे भविष्य सुरक्षित करणारे, आरोग्यदायी समाज घडविणारे आणि राष्ट्रीय आरोग्य धोरणांना बळ देणारे आहे. अशा सेवाभावी डॉक्टरांचे कौतुक करणे, त्यांना प्रोत्साहन देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

डॉ. रामहरी बेले यांना त्यांच्या ११११ यशस्वी शस्त्रक्रियांसाठी मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांची सेवा, समर्पण आणि कार्यनिष्ठा पुढील पिढीसाठी निश्चितच दीपस्तंभ ठरेल.

## इंदोरमध्ये भव्य गुरु गोरक्षनाथ धर्मबीज महोत्सवाचे आयोजन

### महाराष्ट्रातील भाविकांना सहभागी होण्याचे आवाहन

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

नाथ संप्रदायाचे आराध्य दैवत गुरु गोरक्षनाथ यांचा 'धर्मबीज महोत्सव' १९ आणि २० जानेवारी रोजी इंदोर (मध्यप्रदेश) येथे उत्साहात साजरा होणार आहे. 'नाथजोगी मराठी समाज, इंदोर' यांच्या वतीने गेल्या २६ वर्षांपासून हा सोहळा आयोजित केला जात असून, यंदाही बापट रुग्णालयामागील नवनाथ सत्संग वाटिकेत हा महोत्सव पार पडेल.

डॉ. अनुराग वैद्य व डॉ. अनुपम वैद्य यांनी दिलेल्या माहितीनुसार, या महोत्सवात महाराष्ट्र, विदर्भ, गुजरात आणि राजस्थानसह देशभरातील समाजबांधव एकत्र येणार आहेत. या सोहळ्याला महामंडलेश्वर संतश्री दादू महाराज, मध्यप्रदेशचे मंत्री कैलास विजयवर्गीय, खासदार उमेशनाथ महाराज, आमदार रमेश मैंदोला यांच्यासह विविध संत-महंत आणि



मान्यवर उपस्थित राहणार आहेत. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी नाथजोगी मराठी समाज इंदोरचे अध्यक्ष सुनील विश्वनाथ वैद्य, संरक्षक महेश वैद्य यांच्यासह महिला मंडळाच्या प्रमिला वैद्य, भारती वैद्य व सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. विदर्भ व महाराष्ट्रातील समाजबांधवांनी या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि.७ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक

## शहरात मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन

प्रतिनिधी ७ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी बुधवार दि. ७ जानेवारी २०२६ रोजी शहरात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

मनपा प्रशासनाकडून या संदर्भातील अधिकृत आदेश निर्गमित करण्यात आले असून, सर्व विभाग प्रमुख, मुख्याध्यापक आणि शिक्षकांना या रॅलीत सहभागी होण्याचे निर्देश देण्यात





आले होते. या रॅलीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

ही जनजागृती रॅली सकाळी ११ वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयापासून सुरू होईल. रॅलीमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विहित वेळेच्या एक तास आधी उपस्थित राहण्याच्या सूचना उप-आयुक्त (प्रशासन) यांनी दिल्या होत्या. महानगरपालिका मुख्य कार्यालयापासून सुरू होऊन ही रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून फिरली. मनपा कार्यालय (प्रारंभ) ते ओपन थिएटर ते फतेह चौक ते संतोषी माता मंदिर चौक ते रामदास पेठ पोलीस स्टेशन ते रेल्वे स्टेशन रोड ते गड्डम प्लॉट ते सातव चौक ते जठारपेठ चौक ते होली क्रॉस शाळा ते रामनगर ते एल.आर.टी. कॉलेज ते नेहरू पार्क चौक ते अशोक वाटिका ते जिल्हाधिकारी कार्यालय ते शासकीय बगीचा सिटी कोतवाली गांधी रोड आणि शेवटी पुन्हा मनपा मुख्य कार्यालय येथे रॅलीचा समारोप झाला. मतदान जनजागृतीसाठी या रॅलीमध्ये आठ चित्ररथ, जनजागृतीपर वाहन, पथनाट्य वाहन, कचरा संकलन घंटागाड्या आणि मोटार सायकलींचा समावेश असणार आहे. विविध जनजागृतीपर फलकांच्या माध्यमातून नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले जाईल. शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची आज सभा

प्रतिनिधी ७ जानेवारी

**अकोला :** शिंदेसेनेचे राष्ट्रीय प्रमुख आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बुधवारी ७ जानेवारी रोजी दुपारी १ वा. जुने



शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानात पक्षाच्या उमेदवारांसाठी प्रचार सभा आयोजित केली आहे. या सभेमुळे अकोल्यातील मनपा निवडणुकीच्या राजकीय समीकरणांना नवे वळण मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे .शिंदेसेनेचे विदर्भ समन्वयक ना. संजय राठोड यांच्या नेतृत्वात पक्षाने माजी आमदार श्रीकांत देशपांडे, डॉ. शशिकांत खेडेकर यांनी निरीक्षक म्हणून निवडणुकीची तयारी केली आहे. सभेत उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते मनपा निवडणूक वचननाम्याचे प्रकाशन होणार आहे. युवासेना सचिव विठ्ठल सरप पाटील आणि उपजिल्हाप्रमुख योगेश अग्रवाल यांनी वचननामा तयार केला आहे.

# पोलिस युनिटी चषक बॉक्स क्रिकेट स्पर्धा

## ♦ २० संघांचा स्पर्धेत होता सहभाग



प्रतिनिधी ७ जानेवारी

**अकोला :** महाराष्ट्र पोलिस वर्धापन दिनानिमित्त जिल्हा पोलिस दलातर्फे आयोजित अकोला पोलिस युनिटी चषक पोलिस अधीक्षक संघाने पटकावला, तर इंजिनियर संघ उपविजेता ठरला. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून अकोला पोलिस युनिटी चषक बॉक्स क्रिकेट स्पर्धा-२०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत वीस संघानी सहभाग घेतला. साखळी पद्धतीने सामने खेळविण्यात आले. यामध्ये पोलिस अधीक्षक संघ व इंजिनियर संघात अंतिम सामना झाला. पोलीस अधीक्षक संघाने प्रथम फलंदाजी करताना आठ षटकात एकशे तीनधावा केल्या. धावांचा पाठलाग करताना इंजिनियर संघाला ब्यांशी धावांवर रोखत विजय मिळविला. स्पर्धेच्या समारोप सोहळ्याला प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे, जिल्हाधिकारी वर्षा मीना, पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, महानगर पालिका आयुक्त सुनील लहाने, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शंकर शेळके आदी मान्यवरांची उपस्थिती होती. विजेता उप विजेता संघांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी दिली. स्पर्धेसाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनात परिश्रम घेतले.

# निलेश देव यांच्यासाठी सुजात आंबेडकर मैदानात

प्रतिनिधी ७ जानेवारी

## ♦ वंचितच्या उमेदवाराला विजयी करा - आंबेडकर

**अकोला :** स्थानिक पातळीवर जनसेवक निवडण्याची ही वेळ आहे. त्यामुळे आपल्या हक्काच्या लोकांना मतदान करा. असे आवाहन वंचित युवा नेते सुजात आंबेडकर यांनी केले. त्यांनी सोमवारी निलेश देव यांच्या प्रचारासाठी प्रभाग तीनच्या विविध भागात प्रचार सभा घेतल्या आणि रॅली काढली. या रॅलीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

दिवंगत नगरसेविका ॲड.धनश्री देव यांनी केलेल्या कामाचा पाठपुरावा निलेश देव करत आहे. न्यू तापडीया नगर उड्डाणपुल असो, न्यू तापडीया नगरच्या पाण्याचा प्रश्न असो, पंचशील नगरचा विकास असो यासाठी निलेश देव धावून येत



आहे. अकोल्यात त्यांच्या इतकी लोकसेवा गेल्या पाच वर्षात कोणी केली नाही असे मत वंचित युवा नेते सुजात आंबेडकर यांनी व्यक्त केले. रुग्ण कल्याणासाठी सुरु केलेली उपकरण बँक असो, आदिवासींना मदत असो, रुग्णांना रक्त पाहिजे निलेश देव यांना आपण फोन लावतो. ॲम्बुलन्स असो की वैकुंठ रथ असो यासर्व सेवा निलेश देव यांनी अविरत चालू ठेवल्या. लोकांच्या हितासाठी निलेश देव यांनी उपोषण केले. खाजगी कर वसुली करणारी स्वाती इंडस्ट्रीजचा गाशा गुंडाळला गेला. नगरसेवक नसताना लोकांसाठी कायम उपलब्ध असणाऱ्या निलेश देव यांच्या लोकसेवेला मान्यता देण्यासाठी त्यांना नगरसेवक करण्याचे आवाहन सुजात आंबेडकर यांनी केले.

# सागर भारुकांच्या 'सिंहगर्जना' ने अकोला हादरले ; शिवसैनिकांचा जनसागर उसळला !

## नावासमोरची 'डॉन' ही उपाधी कायमची पुसण्याची ऐतिहासिक घोषणा!

प्रतिनिधी ७ जानेवारी

**अकोला :** उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाचे धडाडीचे युवा नेते सागर भारुका यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीतील एक सर्वात मोठा आणि धाडसी निर्णय जाहीर केला आहे. आपल्या नावामागे लागलेली 'डॉन' ही ओळख आता कायमची त्यागून केवळ 'हिंदू शेर' म्हणून जनतेची सेवा करणार असल्याची सिंहगर्जना सागर भारुका यांनी केली. त्यांच्या या घोषणेने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून मतदारांमध्ये त्यांच्याबद्दलची आत्मीयता अधिक वाढली आहे. सागर भारुका यांच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे भव्य उद्घाटन शिवसेना आमदार नितीन देशमुख यांच्या हस्ते पार पडले. यावेळी अकोल्याच्या राजकारणातील दिग्गज नेते माजी आमदार दाळू गुरुजी, गोपाल दातकर आणि सुरेंद्र विसपुते यांची प्रमुख उपस्थिती होती. या नेत्यांच्या उपस्थितीने भारुका यांच्या उमेदवारीला मोठे बळ मिळाले असल्याचे चित्र दिसत आहे. 'भाजपाची दहशत नको असेल तर हिंदू शेर च्या पाठिशी रहा' उद्घाटन प्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना सागर भारुका भावूक झाले. ते म्हणाले, 'आजपर्यंत अनेकजण मला



'डॉन' म्हणून ओळखायचे, पण आता मला केवळ आपल्या भागाचा विकास करणारा तुमचा हक्काचा 'सेवक' बनायचे आहे.ही निवडणूक गुंडशाहीविरुद्ध नसून विकासासाठी आणि जनतेच्या हक्कासाठी आहे.' त्यांच्या या विधानाला उपस्थित जनसमुदायाने टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला. या सोहळ्याला अकोल्यातील युवा वर्गाचा मोठा पाठिंबा दिसून आला. सुमित बुंदेले, गितेश ठाकूर, निलेश श्रीनाथ, जितु शर्मा, कृणाल शर्मा, दीपक खत्री, अनुराग शर्मा, राजेश दिनोडिया, बबलू श्रीनाथ, निखिल कुकडे, नितीन सिंघानिया, आकाश ठाकूर यांसह शेकडो युवा कार्यकर्त्यांनी सागर भारुका यांना निवडून आणण्याचा निर्धार केला आहे. ज्येष्ठांचा आशीर्वाद आणि तरुणांचा जोश यामुळे भारुका यांच्या प्रचाराने पहिल्याच दिवशी मोठी आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे.शिवसेना आमदार नितीन देशमुख यांनीही सागर भारुका यांच्या कार्याचे कौतुक करत, हा तरुण अकोल्याच्या विकासासाठी आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. भारुका यांनी स्वतःची प्रतिमा बदलण्यासाठी घेतलेला हा 'मेकओव्हर' निर्णय या निवडणुकीत गेमचेंजर ठरू शकतो, अशी चर्चा आता संपूर्ण प्रभागात रंगू लागली आहे. किरण ठाकुर, रणजीत ठाकूर, विनोद गायकवाड, सुनिल शुक्ला, शुभम तिवारी, देवा शर्मा, आकाश ठाकूर, दिलीप अग्रवाल, पारस खंडेलवाल, राजीव शर्मा, संजय शाह, दिपक खत्री, मन्नु अग्रवाल, महेंद्र ठाकूर, पवन जोशी, गोलू खोलिया, कृष्णा तिवारी, आकाश गावंडे, पंकज धबाडे, शाम शाहू, देवेंद्र वखारिया, शेरु मिश्रा, संतोष अटाले, नारायण तायडे, आकाश मिश्रा, योगेश भानुशाली, विकास तिवारी, आयुष परिवाल, लोभेश राऊत, संदिप ठाकूर, भरत केजडीवाल, अंकुश ठाकूर, कैलास तिवारी, पप्पू अण्णा, सुभाष चौधरी, जिग्नेश मेहता, दिपक पाटील, दुर्गा श्रीवास्तव, राजकमल ठाकूर आदि उपस्थित होते.

# प्रभाग 3 मध्ये भाजप उमेदवारांना वाढता प्रतिसाद

प्रतिनिधी ७ जानेवारी

## ♦ संपूर्ण प्रभाग पिंजून काढताहेत उमेदवार, कार्यकर्ते

**अकोला :** प्रभाग क्रमांक ३ मध्ये भारतीय जनता पक्षाचे सागर शेगोकार, प्रशांत जोशी, नीतू जगताप आणि शशिकला काळे यांच्या पॅनेलला वाढता पाठिंबा मिळत आहे. हा प्रभाग खूप मोठा असल्याने प्रत्येक मतदान संपर्क साधला जात आहे. बुधवारी सकाळ पासून सिद्धीविनायक मंदिर परिसरात संपर्क साधण्यात आला.

या प्रभागाचा विस्तार मोठा आहे. आणि आता राहिलेल्या सात आठ दिवसात मतदारां पर्यंत पोहचवण्यासाठी उमेदवारांसह कार्यकर्त्यांची चांगलीच धावपळ होत आहे. अकोला पूर्व मतदारसंघाचे आमदार रणधीर सावरकर यांच्या माध्यमातून तसेच



भारतीय जनता पक्षाच्या हाती महापालिकेची सत्ता असताना विकासाची प्रचंड कामे आमची जमेची बाजू आहे असा विश्वास व्यक्त केला जातो आहे.

जठारपेठ, ज्योती नगर, सिद्धी विनायक मंदिर आणि लगतच्या भागातील मतदारांशी प्रत्यक्ष संपर्क साधण्यात आला. भारतीय जनता पक्षाचे संकल्प पत्र मतदारांपर्यंत नेले जात आहे. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांचे ठिकठिकाणी स्वागत केले जात आहे. केंद्रात आणि राज्यात भाजप आणि मित्र पक्षांची सत्ता असल्याने महापालिकेत भाजपची सत्ता पुन्हा येण्यासाठी प्रत्येक उमेदवार महत्त्वाचा असल्याची भावना मतदारांच्या बोलण्यातून जाणवते. मतदारांचा विश्वास प्राप्त करण्यात सागर शेगोकार, प्रशांत जोशी, नीतू जगताप, शशिकला काळे यशस्वी ठरत आहे असे चित्र प्रभाग क्रमांक ३ मध्ये दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाशी भाजपची युती असल्यामुळे त्याचा फायदा देखील होणार याबाबत दुमत नाही. भाजपच्या माजी नगरसेविका गीतांजली शेगोकार, माजी नगरसेविका अपूर्वा कुळकर्णी, प्रवीण भिवगडे, आशिष अडसड, उमेश श्रीवास्तव, शिवशंकर झामरे, पवन भैय्यावार यांच्यासह शेकडो कार्यकर्ते प्रचाराची धुरा सांभाळत आहेत

# भाजपा महायुतीचा महानगरात झंझावात

प्रतिनिधी ७ जानेवारी

**अकोला :** काल प्रभाग क्र २० मध्ये प्रचार कार्यालयाचे उद्घाटन व उमेदवारांच्या प्रचारार्थ पदयात्रा तसेच प्रभाग क्र १३ मध्ये प्रचार कार्यालयाचे उद्घाटन व प्रभाग क्र १० मध्ये प्रचार कार्यालयाचे उद्घाटन व पक्षप्रवेश सोहळा काल आ. रणधीरभाऊ सावरकर यांच्या उपस्थितीत पार पडला. जनसंवाद, पक्ष प्रवेश, पदयात्रा व प्रचार कार्यालयांचे उद्घाटन या सर्व झंझावातामुळे अकोला महानगर भाजपमय झालेले आहे. यावेळी आ. रणधीर भाऊ सावरकर यांच्यासह खा





अनुपभाऊ धोत्रे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे शहर अध्यक्ष विजयराव देशमुख, भाजप महानगर अध्यक्ष जयंतराव मसने, माजी महापौर विजुभाऊ अग्रवाल, डॉ.किशोर मालोकार श्रावणभाऊ इंगळे, योगेश मानकर, छोटूभाऊ लुंगे, संजय गोडा, सोनल ठक्कर आदींसह सर्व पदाधिकारी व पक्षाचे सर्व उमेदवार उपस्थित होते.

# ज्ञानगंगा अभयारण्यात वाघाला सोडले

प्रतिनिधी ७ जानेवारी

**अकोला:** बुलढाणा जिल्ह्याला समृध्द वनसंपदेला साजेशी घटना समोर आली आहे. वन्यजीव विभागाने अन्नसाखळीतील प्रमुख घटक असलेला वाघ हा ज्ञानगंगा अभयारण्यामध्ये सोडण्यात आला असून बुलढाणा- खामगाव रस्त्यालगत असलेल्या बोथा घाटात वाघोबाची डरकाळी ऐकायला मिळाल्यास नवल वाटायला नको! पांढरकवडा अभयारण्यात जन्माला आलेल्या तथा नागपूर येथील पेंच व्याघ्र प्रकल्प मधील 'पीकेटी ७ सीपी १' नावाच्या तीन वर्ष वयाच्या नर वाघाला ज्ञानगंगा अभयारण्य क्षेत्रात मुक्त करण्यात आले आहे. हा वाघ अवघ्या सहा महिन्याचा असतानाच याची आईचा मृत्यू झाला होता






त्यानंतर या वाघासह त्याच्या बहिणीला पेंच व्याघ्र प्रकल्पात देखरेखी मध्ये ठेवण्यात आले होते. गेल्या तीन वर्षात या वाघाने शिकार करणे तसेच जगण्यासाठी आवश्यक असलेले सर्व कौशल्य पेंच व्याघ्र प्रकल्पात प्राप्त केले. पीकेटी ७ सीपी १ या वाघाला ज्ञानगंगा अभयारण्य मध्ये पाच हेक्टर च्या विशेष क्षेत्रात देखके केली ठेवण्यात आले असून त्याच्या हालचालीवर ट्रॅप कॅमेरे तसेच म्नू कॅमेराच्या कॅमेऱ्याच्या माध्यमातून नजर ठेवण्यात येत आहे. सदरची कारवाई वन्यजीव विभागाचे विभागीय वन अधिकारी नागुलवार, सहाय्यक वनसंरक्षक चेतन राठोड यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्राधिकारी दीपेश लोखंडे व प्रकाश सावळे, संजय राठोड, श्रीकृष्ण बोबडे तसेच इतर कर्मचाऱ्यांनी पार पाडली. सध्या स्थितीत 'पीकेटी ७ सीपी १' या पट्टेदार वाघाची डरकाळी ज्ञानगंगा अभयारण्यात गुजत आहे

# महिला संवाद मेळाव्याला मातृशक्तीची प्रचंड उपस्थिती

प्रतिनिधी ७ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने प्रभाग क्रमांक १५ मधून ज्या नावांवर विश्वास दर्शवला आहे, त्यामध्ये अकोल्याचे माजी नगराध्यक्ष हरीश आलीमचंदानी यांचे नाव आघाडीवर आहे. त्यांच्यासोबतच मनीषा भंसाली, शारदा खेडकर आणि बाळ टाले यांनाही भाजपने पुन्हा उमेदवारी दिली आहे. हरीश आलीमचंदानी यांची ओळख एक सुसंस्कृत, साधे जीवन जगणारे आणि संघटनेला प्राधान्य देणारे नेते म्हणून राहिली आहे. त्यांचा नेहमीच पक्षशिस्त आणि सामूहिक निर्णय प्रक्रियेवर विश्वास असतो. याच





कारणामुळे कार्यकर्ते आणि मतदारांमध्ये त्यांच्याबद्दलचा विश्वास कायम आहे. स्वच्छ प्रतिमा, साधी राहणी आणि विकासोन्मुख विचार या गुणांमुळे हरीशभाईंना मातृशक्तीचा मोठा आणि उत्साहपूर्ण पाठिंबा मिळत आहे. महिलांमध्ये त्यांची संवेदनशीलता, सुरक्षा आणि सामाजिक प्रश्नां बाबतची तळमळ यामुळे सखोल विश्वासाचे वातावरण दिसत आहे. विश्वास आणि स्वच्छ प्रतिमा हीच त्यांची खरी ओळख बनली आहे. नगरसेवक आणि नगराध्यक्ष असताना त्यांनी केलेली विकासकामे आजही शहराची ओळख आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सामाजिक सुविधा आणि जनसामान्यांच्या समस्यांवरील त्यांची तत्परता यामुळे ते अकोलेकरांचे नेते बनले आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची चर्चा आज केवळ प्रभाग १५ पुरती मर्यादित नसून, संपूर्ण अकोला शहरात त्यांच्या नावाचा दबदबा आणि विश्वास पाहायला मिळत आहे. यामुळेच या निवडणुकीत हरीश आलीमचंदानी यांच्या लोकप्रियतेचा थेट फायदा भाजपच्या इतर उमेदवारांनाही मिळताना दिसत आहे. राजकीय जाणकारांच्या मते, त्यांच्या सकारात्मक प्रतिमेमुळे भाजपच्या किमान सात अन्य उमेदवारांना निर्णायक आघाडी मिळण्याची दाट शक्यता आहे.

हरीश भाईंची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांची स्वच्छ प्रतिमा, प्रगत विचार आणि साधी जीवनशैली. सत्तेच्या डामडौलापासून दूर राहून ते जमिनीशी जोडलेले नेते म्हणून ओळखले जातात. हीच साधेपणा आणि प्रामाणिकता अकोल्याच्या नागरिकांच्या मनात त्यांच्याबद्दल आपुलकी निर्माण करते. आज अकोल्यात हे स्पष्ट मत समोर येत आहे की, हरीश आलीमचंदानी यांचा विजय निश्चित मानला जात आहे. मात्र, यावेळी ही निवडणूक केवळ एका प्रभागापुरती मर्यादित राहणार नाही. पहिल्यांदाच त्यांच्या नेतृत्वक्षमतेमुळे, मार्गदर्शनामुळे आणि जमिनीवरील संघटनात्मक पकडीमुळे इतर प्रभागांतही भाजपला थेट आणि निर्णायक लाभ मिळताना दिसत आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK